# अभंग गीतें

## ज्ञानेश्वर-रामदास तुकाराम

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७८२९



REFBK-0012709
REFBK-0012709

काव्य
३६८८३
१५.८.६४.
सं. शा.
१६२१

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३६८८३ वि: काव्य
क्रमांक १६२१ नों दि: १५।८।६४

सद्धर्म
प्रकाशन

# अभंग

# गीतें

ज्ञानेश्वर – रामदास तुकाराम

वा. क्र. १२८०९.

REFBK-0012709
REFBK-0012709

अनुवादक
[illegible]ंडोपंत हरिभक्त
'ऋग्वेदाची ओळख'
ह्या पुस्तकाचे लेखक

कासया एकान्त सेवूं तया वना।
आनंद तो या जनामाजी असे॥
—तुकाराम

मूल्य
एक रुपया

**मुखपृष्ठ**

अनादि निर्मळ वेदाचें जें मूळ ।
परब्रह्म सोज्वळ विटेवरी ॥
कर दोन्ही कटीं राहिलासे उभा ।
नीलवर्ण प्रभा फांकतसे ॥
—चोखा मेळा

© गो. म. नवाथे
पहिली आवृत्ति
आषाढ शुद्ध १, शक १८८४

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
गो. म. नवाथे
९ ओवेन्डन रोड
गांवदेवी, मुंबई ७

# परिचय

विश्वाच्या बुडाशीं सत्य म्हणजे शाश्वत असें जें एक महान् तत्त्व आहे त्यालाच वेगवेगळालीं देवतांचीं नांवें दिलीं जातात असें–"एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति" ह्या मंत्रद्वारा ऋग्वेदकालीन ऋषींनीं ध्वनित केलें. त्या तत्त्वालाच उपनिषदकारांनीं ब्रह्म अथवा आत्मतत्त्व म्हटलें. अगदीं अलीकडच्या काळांत ज्ञानेश्वर, रामदास, तुकारामादि संतांना तेंच तत्त्व श्रीपांडुरंगाच्या रूपानें विटेवर उभें असलेलें दिसलें.

आपल्या साऱ्या वासना, भावना आणि इंद्रियें पांडुरंगाच्या चरणीं अर्पण करून संत पांडुरंगमय बनले आणि पांडुरंग आपल्या अंतर्यामींच असल्याची त्यांना प्रचीति आली. त्यासाठीं केलेली साधना आणि त्यामुळें प्राप्त झालेला अनिर्वाच्य आनंद ह्यांचें दिग्दर्शन त्यांच्या प्रासादिक वाणींतून निघालेल्या अभंगांतून झालेलें आहे. त्यांपैकीं कांहीं निवडक अभंग ह्या पुस्तकांत संग्रहित केलेले आहेत. त्यांवरून संतांच्या त्या आनंदमय अवस्थेची कल्पना येऊन सहृदय वाचकांना जीवनांत खराखुरा आनंद प्राप्त करून घेण्यासाठीं काय केलें पाहिजे तें ध्यानांत येईल.

संतांची वाणी सुगम आहे. परंतु त्यांच्या काळचे शब्दप्रयोग, त्यांची मांडणी व एकंदर विचारपरंपरा ह्यांत आज बराच फरक झाला असल्यानें सकृत्दर्शनीं सोपे वाटणाऱ्या अभंगांचाही अर्थ एकदम ध्यानांत येत नाहीं. म्हणून अभंगांच्या बरोबर त्यांचा भावार्थही त्यांखालीं सोप्या भाषेंत दिला आहे. त्यामुळें वाचकांस संतांच्या अंतरंगांत शिरणें सोपें जाईल.

भावार्थ देतांना श्री. य. रा. दाते ह्यांनीं प्रकाशित केलेला ' महाराष्ट्र शब्दकोश ' अधिकृत समजून त्याला धरूनच शब्दांचे अर्थ घेतले आहेत. अर्थाची कोठेंही ओढाताण न होऊं देण्याची कटाक्षानें काळजी घेण्यांत आली आहे. अभ्यासूंस त्याचा पडताळा येईलच.

हे अभंग जसे गोड तसेच ते सहजपणें गेय असेही आहेत. गाण्याच्या तानालकेऱ्या न मारतांही अगदीं साध्या चाली लावून ते श्रवणमधुर होतात असें थोडासा प्रयत्न केला असतां ध्यानांत येईल.

सुदैवानें हल्लीं महाराष्ट्रांत आपल्या लोकांना विशेषतः महिलांना अभंगांची गोडी अधिकाधिक प्रमाणांत लागत असल्याचें दिसून येत आहे. ठिकठिकाणीं स्थापन होत असलेल्या भजनी मंडळांवरून हें स्पष्टच आहे. ज्ञानेश्वरांपासून रामदास–तुकारामांपर्यंतच्या अनेक संतांचे अभंग ह्या पुस्तकांत संग्रहित केले असल्यानें तें सर्वांना आकर्षक वाटेल अशी आशा आहे.

भजनप्रेमी मंडळींनां सोईचें पडावें म्हणून प्रत्येक पानावर एकच अभंग दिला असून त्यासाठीं मोठ्या टाइपाची योजना केली आहे. भावार्थ बारीक टाइपांत दिला असल्यानें त्यापायीं अडखळण्यास होणार नाहीं. पुस्तकाची किंमत अगदीं कमी ठेविली असल्यानें कोणासही तें विकत घेणें शक्य होईल.

अनुक्रमणिकेवरून संतांच्या नांवांप्रमाणें त्यांचे अभंग पाहातां येतील. शेवटीं दिलेल्या सूचीवरून अभंगांच्या सुरुवातीच्या शब्दांवरून ते शोधून काढणें सुलभ होईल.

संतांच्या अभंगांचे कालौघामुळें अनेक पाठभेद झाले असल्याचें सर्वश्रुत आहे. वाचकांच्या तोंडीं शुद्ध पाठ असावेत म्हणून संतगाथांच्या निरनिराळ्या अनेक प्रती परिश्रमपूर्वक ताडून योग्य वाटलेले पाठच घेण्यांत आले आहेत.

हें प्रकाशन सर्वांना उपयुक्त वाटून संतवाणीचा अधिकाधिक प्रसार होऊन त्यापासून प्राप्त होणारा आनंद सर्वांस मिळो हेंच पांडुरंगाजवळ मागणें आहे.

गुंडोपंत हरिभक्त

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| नमन | ७ | निर्मळाबाई | ४८ |
| ज्ञानेश्वर | ८-११ | नरहरि सोनार | ४९ |
| निवृत्तिनाथ | १२ | सांवता माळी | ५० |
| सोपानदेव | १३-१४ | जगमित्र नागा | ५१ |
| मुक्ताबाई | १५ | सेना न्हावी | ५२-५४ |
| गोरा कुंभार | १६ | कान्हो पाठक | ५५ |
| विसोबा खेचर | १७ | मालोपंत | ५६ |
| नामदेव | १८-३२ | भागूबाई | ५७ |
| परिसा भागवत | ३३ | कान्होपात्रा | ५८-५९ |
| जनाबाई | ३४-३९ | भानुदास | ६० |
| नारा | ४० | एकनाथ | ६१-६७ |
| लिंबाई | ४१ | रामदास | ६८-७२ |
| लाडाई | ४२ | निळोबा | ७३-७४ |
| चोखा मेळा | ४३-४५ | तुकाराम | ७५-९२ |
| सोयराबाई | ४६ | पसायदान | ९३ |
| बंका महार | ४७ | | |

पृष्ठ ४९ वर "शिव आणि विष्णु एकाचि प्रतिमा" असें छापिलें आहे, त्याऐवजीं "शिव आणि विष्णु एकचि प्रतिमा" असें वाचावें.

ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥

देवा तूंचि गणेशु । सकलार्थमतिप्रकाशु ।
म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ॥ २ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 36083 वि: काव्य
क्रमांक 1629 नों दि: 25/8/80
92606

वेदांनीं वर्णन केलेल्या आदिपुरुषाला वंदन असो.

स्वयंप्रेरणेनें दृश्यमान झालेल्या त्या आत्मस्वरूपी देवाधिदेवाचा जयजयकार असो.

देवा, सकळांच्या बुद्धीला प्रकाश देणारा गणेश तूंच आहेस.

तर श्रोतृगणहो, सावधान चित्तानें ऐका—

अवघाची संसार सुखाचा करीन ।
आनंदें भरीन तीन्ही लोक ।। १ ।।

जाईन गे माये तया पंढरपुरा ।
भेटेन माहेरा आपुलिया ।। २ ।।

सर्व सुकृतांचें फळ मी लाहीन ।
क्षेम मी देईन पांडुरंगीं ।। ३ ।।

बाप रखुमादेवीवरु विठ्ठलेशीं भेटी ।
आपुले संवसाटी करुनि ठेला ।। ४ ।।

मी अवघें विश्वच सुखी करीन – त्रिभुवनांत आनंद पसरवीन :

मी पंढरपुराला जाईन, आपल्या माहेराला भेटेन आणि तेथें साऱ्या पुण्याईचें जें फळ – पांडुरंगाचें दर्शन – तें मला लाभेल : मी पांडुरंगाला कडकडून मिठी मारीन.

विठ्ठलाच्या भेटीसाठीं मी त्याच्यासारखाच तिष्ठत उभा आहें.

गुजगुजित रूप सांवळें सगुण ।
अनुभवितां मन वेडें होय ॥ १ ॥

भ्रमर-गुंफा ब्रह्मरंध्र तें सुरेख ।
पहातां कौतुक त्रैलोकीं ॥ २ ॥

आनंद-स्वरूप प्रसिद्ध देखिलें ।
निजरूप संचलें सर्वां ठायीं ॥ ३ ॥

ज्ञानदेव म्हणे या सुखाची गोडी ।
अनुभवाची आवडी सेवीं रया ॥ ४ ॥

ती गुटगुटीत सांवळी मूर्ति पाहिली कीं मन वेडावून जातें.

भुंग्याला कमळाच्या बंदिवासांत, अगर योग्याला टाळूंत श्वास कोंडून ठेविला असतां होत असतो, तो साऱ्या त्रिभुवनाचा आनंद मला तें सुंदर रूप पाहून होत आहे.

प्रत्यक्ष आनंदच असें तुझें तें सर्वांना परिचित असलेलें रूप ठायीं ठायीं पसरलेलें मला दिसतें आहे.

त्यापासून प्राप्त होणाऱ्या सुखाची गोडी अनुभवानेंच चाखावयास हवी—शब्दांनीं तिचें वर्णन कसें करणार ?

रूप पाहतां लोचनीं ।
सुख जालें वो साजणी ॥ १ ॥

तो हा विठ्ठल बरवा ।
तो हा माधव बरवा ॥ २ ॥

बहुतां सुकृतांची जोडी ।
म्हणुनि विठ्ठलीं आवडी ॥ ३ ॥

सर्व सुखाचें आगरु ।
बाप रखुमादेवीवरु ॥ ४ ॥

गड्यांनो, डोळ्यांनीं त्याचें तें रूप पाहून मनाला समाधान झालें.

आमचा तो विठ्ठल, तो माधव किती सुंदर आहे म्हणून सांगूं !

आमची पुण्याई फार थोर असली पाहिजे, म्हणूनच आम्हांला विठ्ठलाची आवड आहे.

आमचा विठ्ठल म्हणजे साऱ्या सुखाचें केवळ आगरच आहे.

ज्ञा ने श्व र

पैल तो गे काऊ कोकताहे । शकुन गे माये सांगताहे ॥ १ ॥

उड रे उड रे काऊ तुझे सोन्यानें मढीन पाऊ ।
पाहुणे पंढरीरावो घरा कैं येती ॥ २ ॥

दहिंभाताची उंडी लावीन तुझ्या तोंडीं ।
जीवा पढिये त्याची गोठी सांग वेगीं ॥ ३ ॥

दुधें भरूनी वाटी लावीन तुझे वोंठीं ।
सत्य सांगे गोठी विठो येईल कायी ॥ ४ ॥

आंबया डहाळीं फळें चुंबी रसाळीं ।
आजिचे रे काळीं शकुन सांगें ॥ ५ ॥

ज्ञानदेव म्हणे जाणिजे ये खुणें ।
भेटती पंढरीराणे शकुन सांगें ॥ ६ ॥

तो पाहा, पलीकडे तो काऊ काव काव करून कांहीं तरी चांगली बातमी सांगतो आहे.

कावळ्या कावळ्या उडून जा. तुझे पाय सोन्यानें मढवीन. सांग, आमच्या घरीं पाहुणे पंढरीराव केव्हां येतील बरें ?

तुझ्या तोंडाला दहींभाताची मूद लावीन. सांग, आमच्या प्रिय पंढरीरायांची बातमी लवकर सांग.

दुधाची वाटी तुझ्या ओठांशीं धरीन. खरें सांग, विठोबा केव्हां येतील ?

आंब्याच्या डहाळीवर बसून रसाळ आंबे खा. आज आम्हांला शकुन होऊं दे.

काऊ, काय त्या खाणाखुणा ओळख आणि पंढरीराजांच्या भेटीची शुभवार्ता आम्हांला सांग.

जेथें पाहें तेथें व्यापिलें अनंतें ।
तयाविण रितें कोण ठाय ॥ १ ॥

गगनेंवीण ठावो नाहीं जैसा रिता ।
तैसा या अच्युताविणें कांहीं ॥ २ ॥

तेथें माझ्या चित्ता करी रहिवासु ।
न नकरी उदासु ऐसियातें ॥ ३ ॥

निवृत्तीनें मन ठेविलें चरणीं ।
नामाची निशाणी अखंडित ॥ ४ ॥

जेथें पाहावें तेथें अनंत भरलेला आहे. तो नाहीं असें कोणतें ठिकाण आहे ?

ज्याप्रमाणें आकाश ( पोकळी ) नाहीं अशी मोकळी जागा नाहीं, त्याप्रमाणेंच जेथें अच्युत नाहीं असें एकही स्थान नाहीं.

माझ्या चित्ता, तूं त्या अच्युताचा आश्रय घे. तो तुला खचित दु:खी होऊं देणार नाहीं.

मीं आपलें मन त्याच्या पायांशीं स्थिर केलें आणि हरिनामाची शिडी अखंडित असल्यानें तिचा अवलंब केला आहे.

## सो पा न दे व

ज्या रूपाकारणें उपवास पारणें ।
ध्येय ध्यान धारणें ध्याती मौनी ॥ १ ॥

तें रूप पंढरी पुंडलिकाचें द्वारीं ।
ध्याति वेद चारी श्रुतिसहित ॥ २ ॥

त्या रूपें वेधलें मन माझें मोहिलें ।
न करी कांहीं केलें काय करूं ॥ ३ ॥

सोपान अढळ मन मोहिला गोपाळ ।
त्या रूपा वाचाळ जिव्हा झाली ॥ ४ ॥

ज्या रूपाच्या प्राप्तीसाठीं उपास व पारणीं केलीं जातात, ज्याच्यासाठीं मुनिजन ध्यान, धारणा, इत्यादि गोष्टी करीत असतात आणि ज्यांचें विवेचन चारी वेदांनीं केलें आहे, तें रूप येथें पंढरीस पुंडलिकाचे पाठीशीं उभें राहिलें आहे.

त्या रूपानें माझें मन आकर्षिलें जाऊन मी वेडावून गेलों आहें. काय करूं ! कांहीं केल्या माझ्या हातून आतां दुसरें कांहींच होत नाहीं.

गोपाळानें मोहून टाकल्यामुळें मी अगदीं निश्चल झालों असलों तरी त्याच्या रूपाचें वर्णन करण्यासाठीं माझी जिव्हा मात्र आतां वाचाळ झाली आहे.

हरीवीण भावो न धरावा पोटीं ।
सर्वभावें सृष्टी एका तत्वें ॥ १ ॥

तत्वतां श्रीहरि सर्वांघटीं आहे ।
उभारोनि बाहे वेद बोले ॥ २ ॥

हरीवीण नाहीं जीव शिव पाहीं ।
शिवाच्या हो देहीं आत्मा हरि ॥ ३ ॥

सोपान म्हणे हरीवीण नाहीं तत्त्व ।
हरि हाचि सर्वत्र सर्वां वसे ॥ ४ ॥

हरीशिवाय दुसरी कोणतीही भावना मनांत धरूं नये. सृष्टींतील सर्व भावनांच्या मुळाशीं एकच तत्त्व आहे.

वेद आग्रहानें सांगत आहेत कीं श्रीहरि खरोखरच सर्व वस्तूंत आहे.

पाहा, हरीशिवाय जीव नाहीं आणि शिवही नाहीं. एवढेंच काय पण प्रत्यक्ष शिवाच्याही देहांतील आत्मा हरिच आहे.

हरीशिवाय दुसरें कुठलेंही तत्त्व अस्तित्त्वांत नाहीं. हरि हाच सर्वत्र सर्वांठायीं भरलेला आहे.

अवघाचि संसार केला आम्ही गोड ।
झाडें आणि झूड ब्रह्मरूप ॥ १ ॥
माता आणि पिता गण आणि गोत ।
कन्या आणि सुत ब्रह्मरूप ॥ २ ॥
वापी कूप सिंधू आणि सरोवर ।
दरे आणि खोरे ब्रह्मरूप ॥ ३ ॥
हत्ती आणि घोडे बैल आणि रेडे ।
मुंगी आणि माकुडें ब्रह्मरूप ॥ ४ ॥
आनंदाचें लेणें मुक्ताबाई ल्याली ।
पालवूं लागली चांगयासी ॥ ५ ॥

अवघें विश्वच आतां आम्हीं गोड केलें आहे. झाडेंझुडें वगैरे यच्चयावत् वस्तु ब्रह्ममय आहेत ह्या विचारानें आम्हांला आनंदीआनंद झाला आहे.

आईबाप, गणगोत, मुलेंमुली हीं सारीं ब्रह्मरूप आहेत.

एवढेंच काय पण आड-विहिरी, नद्या-तलाव, दऱ्या-खोरीं, तद्वतच हत्ती-घोडे, बैल-रेडे, मुंग्या आणि माकडें हींसुद्धां सारीं त्या ब्रह्माचींच रूपें आहेत.

ह्या जाणिवेनें आनंदित झालेली मुक्ता चांगदेवाला डोलवूं लागली आहे.

बाळा चांग्या, डोल, आनंदानें डोल. अवघेंच विश्व आतां आपल्यासाठीं गोड बनलें आहे.

मुकिया साखर चाखाया दिधली ।
बोलतांही बोली बोलवेना ॥ १ ॥

तो काय शब्द खुंटला संवाद ।
आपुला आनंद अवधाराया ॥ २ ॥

आनंदीं आनंद मिळोनी राहणें ।
अखंडित होणें नहोनियां ॥ ३ ॥

म्हणे गोरा कुंभार जीवन्मुक्त होणें ।
जग हें करणें शाहणें बापा ॥ ४ ॥

मुक्याला साखर चाखायला दिली असतां त्याची जी अवस्था होते तशांतली ही गत आहे. बोलून दाखवावें तर तें शक्य नसतें.

आपल्याला होत असलेला आनंद व्यक्त करून दाखविण्यासाठीं शब्द तरी कोठून आणावयाचे ? तेथें वाचाच कुंठित होते.

आनंदांत आनंदाची भर पडत असते. कांहीं नसूनसुद्धां त्या आनंदाचा आस्वाद अखंडपणें मिळत असतो.

बाबा रे, अशा प्रकारचा आनंद अनुभवीत असणाऱ्या जीवन्मुक्ताची ही स्थिति कशी असते तें समजावून सांगणें हें जगाला शहाणें करण्याइतकेंच अवघड काम आहे.

## वि सो बा खे च र

नाम आणि रूप । दोनी जया नाहीं ।
तोचि देव पाहीं । येर मिथ्या ॥ १ ॥

जळ स्थळ काष्ठ पाषाणु । पिंड ब्रह्मांड अणुरेणु ।
सर्वस्वें आपणु । साक्ष असे ॥ २ ॥

हें जाणोनिया परते । जाण आप आपणियातें ।
खेचर म्हणे नामयातें । अवघाचि देव ॥ ३ ॥

ज्याला नांव नाहीं, रूप नाहीं तोच खरा देव समज. बाकी सारे मिथ्या मान.

जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, पिंडीं, ब्रह्मांडीं, अणुरेणूंत सर्व ठिकाणीं त्याची प्रचीति येत असते.

हें समजून तूं आतां परत जा, आणि स्वतःच स्वतःची ओळख पटवून घे. नामा, सर्वच देव आहे.



अ. गी. २

नामदेव

अमृताहूनि गोड नाम तुझें देवा ।
मन माझें केशवा कां बा नेघे ।। १ ।।

सांग पंढरीराया काय करूं यासी ।
कां रूप ध्यानासि नये तुझें ।। २ ।।

कीर्तनीं बैसतां निद्रें नागविलें ।
मन माझें गुंतलें विषयसुखा ॥ ३ ॥

हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ति ।
नये माझ्या चित्तीं नामा म्हणे ॥ ४ ॥

देवा केशवा, तुझें नांव अमृताहूनही गोड आहे. तरीसुद्धां माझें मन तिकडे कां बरें वळत नाहीं ?

सांग पंढरीराया, याला मी काय करूं ? तुझ्या रूपाकडे माझें ध्यान कां लागत नाहीं ?

कीर्तनांत बसलों कीं झोंप पिच्छा पुरविते आणि मन विषयसुखाच्या चिंतनांत मग्न होतें.

हरिदास हरिनामाचा इतक्या मोठ्यानें जयघोष करीत असतात तरीसुद्ध तो माझ्या चित्तांत शिरत नाहीं.

सत्य संकल्पाचा कर्ता जो विश्वाचा ।
अनाथ जीवांचा मायबाप ।। १ ।।

पुंडलिकें तया आणिलें रंगणीं ।
कटावरी पाणी ठेवूनीया ।। २ ।।

अणुरेणुमाजीं व्यापूनि राहिला ।
अनेकत्व झाला एकलाचि ।। ३ ।।

नामा म्हणे वेद त्या लागीं बोभाय ।
जोडोनियां पाय उभा ठाके ।। ४ ।।

ज्यानें आपल्या अविनाशी संकल्पानें हें विश्व निर्माण केलें, आणि जो अनाथ जीवांचा मायबाप, अशा त्या परमात्म्याला पुंडलिकानें येथें या वाळवंटांत आणून कमरेवर हात टेकून उभें राहावयास लाविलें आहे.

तो अणुरेणूंत भरलेला असून त्या एकाचींच अनेक रूपें झालेलीं आहेत.

वेदांनीं ज्याचा जयघोष केलेला आहे तोच परमात्मा येथें विटेवर पाय जोडून उभा राहिला आहे.

तुझिया सत्तेनें वेदासी बोलणें ।
सूर्यासीं चालणें तुझिया बळें ॥ १ ॥

ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धणी ।
वर्म जाणूनि शरण आलों ॥ २ ॥

मेघांनीं वर्षावें पर्वतीं बैसावें ।
वायुनें विचरावें सत्ते तुझे ॥ ३ ॥

नामा म्हणें कांहीं न हाले साचार ।
प्रभु तूं निर्धार पांडुरंग ॥ ४ ॥

तुझ्याच सत्तेनें वेद स्फुरण पावले. सूर्याला गतिही तुझ्यामुळेंच मिळाली. इतका तूं समर्थ आहेस. ब्रह्मांडाचा मालकही तूंच आहेस, हें रहस्य ओळखून मी तुला शरण आलों आहें.

मेघ वृष्टि करतात, पर्वत स्थिर असतात, आणि वारे वाहातात, हें सारें तुझ्या सत्तेनेंच होत असतें.

खरोखर, तुझ्यावांचून एक काडीदेखील हालं शकत नाहीं. पांडुरंगा, तूंच सर्वांचा आधार आहेस.

गगनीं ध्रुव तुवां अढळ पैं केला । तैं बाळ धाकुला न म्हणसी ॥ १ ॥

अजामेळाचें तुवां चुकविलें संकट । ब्राह्मण तो नष्ट न म्हणसी ॥ २ ॥

प्रल्हादाचा तुवां केला कैवारु । दैत्याचा कुमरु न म्हणसी ॥ ३ ॥

गजेंद्रपशू सोडविला पानडिये । मृगखोडी ऐसिये न म्हणसी ॥ ४ ॥

रुक्मांगदाची तुवां उद्धरिली नगरी । विषयीं मुरारी न म्हणसी तया

ऐसे अपराधी न म्हणसी देवा । नामा तो केशवा विनवीतसे ॥ ६ ॥

ध्रुवाला अढळपद दिलेंस तेव्हां, 'किती लहान पोर आहे रे हा!' असें तूं म्हटलें नाहींस.

अजामिळाला संकटांतून वांचविलेंस तेव्हां, तो ब्राह्मण दुष्ट होता हें तूं मनांत आणलें नाहींस.

प्रल्हादाचा कैवार घेतांना, तो दैत्याचा पुत्र होता, ह्या गोष्टीकडे तूं पाहिलें नाहींस.

गजेंद्राला डोहांतून सोडवितांना, तो पशु मस्त झाला होता, ह्याचा तूं विचार केला नाहींस.

आणि रुक्मांगदाच्या नगरीचा उद्धार करतांना, त्याच्या विषयीपणाकडेही तूं दुर्लक्ष केलेंस...

देवा, शरण आलेल्यांचे घोर घोर अपराधही तूं पोटांत घातलेस. आतां माझी विनवणी ऐक.



मराठी ... ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92 ७०e
मुंबई ...

## ना म दे व

माझी गती कोण सांग पंढरीनाथा ।
तारिसी अनाथा कीं बुडविसी ॥ १ ॥

मनापासोनियां सांग मजप्रती ।
पुसे काकुलती जीवांचिया ॥ २ ॥

कोणासी सांकडें घालावें हें सांग ।
नको करी राग दीनावरी ॥ ३ ॥

बाळकासी जैसी एकलीच माय ।
तैसे तुझे पाय आम्हालागीं ॥ ४ ॥

नामा म्हणे देवा अनाथाच्या नाथा ।
कृपाळुवा कांता रखुमाईच्या ॥ ५ ॥

सांगा पंढरिनाथा, माझी अवस्था काय होणार, तें सांगा. ह्या अनाथाला तुम्ही तारणार कीं बुडविणार ?

मी काकुळतीला येऊन विचारीत आहें, तर मला अगदीं मनापासून काय तें सांगा.

ह्या गरिबावर राग करूं नका; पण सांगा, मी कोणावर भार घालूं ?

देवा, अनाथाच्या नाथा, कृपाळा रुक्मिणीपते, बालकाला जसा एक आपल्या आईचा तेवढा खरा आधार असतो, तसा मला तुमच्या पायांचाच आधार आहे हो ! !

चक्रवाक पक्षी वियोगें बहाती।
झालें मजप्रती तैसें आतां ॥१॥

चुकलिया माय बालकें रडती।
झालें मजप्रती तैसें आतां ॥ २ ॥

वत्स न देखतां गाई हंबरती।
झालें मजप्रती तैसें आतां ॥३॥

जीवनावेगळे मत्स्य तळमळती।
झालें मजप्रती तैसें आतां ॥४॥

नामा म्हणे मज ऐसें वाटे चित्तीं।
करीतसें खंती फार तुझी ॥५॥

चक्रवाकपक्षी प्रियेचा वियोग झाला असतां जसा विरहानें तिला हाका मारीत सुटतो ;

किंवा आई डोळ्यांआड झाली असतां बालक तिच्यासाठीं आक्रोश करूं लागतें ;

किंवा वासरूं न दिसल्यामुळें गाय जशी हंबरूं लागते;

किंवा पाण्यांतून बाहेर काढलेला मासा जसा तडफडूं लागतो;

त्याप्रमाणें हे देवा, मला आतां तुझ्याविना झालें आहे. तुझ्या भेटीची मला उत्कंठा लागून राहिली आहे.

## ना म दे व

माझे मनोरथ पूर्ण कीजे देवा।
केशवा माधवा नारायणा ॥ १ ॥

नाहीं नाहीं मज आणिक सोयरा।
न करी अव्हेरा पांडुरंगा ॥ २ ॥

अनाथाचा नाथ होशी तूं दयाळा।
किती वेळवेळा प्रार्थूं आतां ॥ ३ ॥

नामा म्हणे जीव होतो कासावीस।
केली तुझी आंस आतां बरी ॥ ४ ॥

हे केशवा, माधवा, नारायणा, देवा माझे मनोरथ पूर्ण कर.

पांडुरंगा, मला आणखी कोणी सोयरा नाहीं रे! माझा अव्हेर करूं नकोस.

दयाळा, ह्या अनाथाचें रक्षण कर, किती वेळां तुझी प्रार्थना करूं!

देवा, जीव कासावीस झाला आहे!

...तुझी वाट पाहात बसण्याखेरीज माझ्या हातीं दुसरें काय आहे!

तुझें रूप माझ्या दाखवीं मनातें ।
मग तुझ्या चरणातें न विसंबे ॥ १ ॥
कां मज शिणविसी थोडिया कारणें ।
काय तुझें उणें होईल देवा ॥ २ ॥
चातकाची तहान पुरवी जळधर ।
काय त्याचें सरे थोरपण ॥ ३ ॥
चंद्र चकोराचा पुरवी सोहळा ।
काय त्याच्या कळा न्यून होती ॥ ४ ॥
कूर्मी अवलोकीं आपुलिया बाळा ।
काय तिच्या डोळां दृष्टि नासे ॥ ५ ॥
नामा म्हणे देवा तुझाचि भरंवसा ।
अनाथा कुंवसा होसि तूंच ॥ ६ ॥

देवा, माझ्या मनाला – अन्तर्दृष्टीला – एकदां आपलें रूप दाखीव, मला दर्शन दे. मग मीं क्षणभर देखील तुझे पाय सोडणार नाहीं.

थोडक्यासाठीं उगाच कां मला शिणवितोस ? देवा, त्यांत तुझें काय कमी होईल ?

मेघानें चातकाची तहान भागविली तर त्यांत त्याच्या मोठेपणाला कांहीं बाध येईल का ?

किंवा चंद्रानें चकोराची हौस पुरविली तर त्यामुळें त्याच्या कला कमी होतील का ?

कासवीनें आपल्या पोराकडे प्रेमदृष्टीनें पाहिलें तर तिची दृष्टि त्यापायीं खास कमी होणार नाहीं.

देवा, आम्हांला तुझाच भरंवसा आहे. तूंच दीनांचा आसरा आहेस.

रुणझुण पायीं वाजताती वाळे ।
दावीं तीं पाऊलें दयानिधी ॥ १ ॥

जनक श्रुतदेव यांच्या घरीं गेलीं ।
दावीं तीं पाउलें दयानिधी ॥ २ ॥

धरियेलें नक्रें तेव्हां जीं धांवलीं ।
दावीं तीं पाउलें दयानिधी ॥ ३ ॥

वस्त्रहरणीं जीं द्रौपदीनें चिंतिलीं ।
दावीं तीं पाउलें दयानिधी ॥ ४ ॥

देखोनिया ज्यांतें कौरव ते भ्याले ।
दावी तीं पाउलें दयानिधी ॥ ५ ॥

धर्म आणि भीष्म विदुरादिक धाले ।
दावी तीं पाउलें दयानिधी ॥ ६ ॥

वाळे रुणझुण रुणझुण असे वाजत आहेत, अशा त्या तुमच्या पावलांचें, हे दयानिधे, मला दर्शन द्या.

जीं जनक आणि श्रुतदेव ह्यांच्या घरीं गेलीं, गजेंद्राला मगरानें मिठी मारली असतां जीं त्याच्या साहाय्याकरितां धावून गेलीं, ज्या पावलांचें चिंतन द्रौपदीनें वस्त्रहरणाच्या प्रसंगीं केलें आणि जीं पाहून कौरव भ्यायले, पण धर्म, भीष्म, विदुरादिकांना संतोष वाटला, तीं आपलीं पावलें, हें दयानिधे, मला दिसूं द्यात.

स्वयंवरासी जातां शिळे उद्धरिलें ।
दावीं तीं पाउलें दयानिधी ॥७॥

नामा म्हणे ज्यांतें बळीनें पुजिलें ।
दावीं तीं पाउलें दयानिधी ॥८॥

भगवान्, सीतास्वयंवरास जातवेळीं आपण ज्या पावलांनीं अहिल्येचा उद्धार केलात, आणि ज्यांची बळिराजानें पूजा केली, तीं आपलीं मंगल पावलें, हे दयानिधे, मला दिसूं द्यात.

अडखळूनी पडसी घालूं नको जोडा । धांवत दुडदुडां येईं आतां ॥ १ ॥
बैसावयासाठीं घेऊं नको घोडा । धांवत दुडदुडा येईं आतां ॥ २ ॥
भोजना बैससी येथें घेईं विडा । धांवत दुडदुडां येईं आतां ॥ ३ ॥
बाहुबळें काढिला देवांचा जो खोडा । धांवत दुडदुडां येईं आतां ॥४॥
नामा म्हणे सुखी लक्ष्मीचा हा चुडा । धांवत दुडदुडां येईं आतां ॥५॥

देवा, तूं आतां दुड्डदुड्ड धांवतच इकडे ये. पायांत जोडे घालूं नकोस, घाईंत अडखळून पडशील.

बसण्यासाठीं घोडा घेण्याच्या भानगडींत पडूं नकोस. उगाच त्यांत वेळ जाईल. तूं आपला पायींच दुड्डदुड्ड धावत ये.

जेवावयाला बसला असशील तर विडा खावयाला येथें ये. विलंब करूं नकोस. दुडदुड धावत ये.

देवांना रावणाच्या बंदिवासांतून सोडविण्यासाठीं जी त्वरा केलीस, त्याच त्वरेनें तूं आमच्याकडे धावत ये.

हे संपन्न लक्ष्मीच्या सौभाग्या, लक्ष्मीपते, ये; आतां इकडे दुड्डदुड्ड धावत ये; विलंब लावूं नकोस.

ना म दे व

वारंवार काय विनवावें आतां । समजावे चित्ता आपुलिया ॥ १ ॥

तूं काय म्हणसी कंटाळेल हाचि । जाईल उगाचि उठोनियां ॥ २ ॥

मजलागीं देवा जासी चुकवोनी । आणिन धरूनि तुजलागीं ॥ ३ ॥

दृढ भक्तिभाव प्रेमाचा हा दोरा । बांधीन सत्वर तुझे पायीं ॥ ४ ॥

नामा म्हणे बोल काय विठो आतां । भेटावें सर्वथा यांत बरें ॥ ५ ॥

देवा, तुझी आतां वारंवार किती विनवणी करूं बरें! आपलया मनाशींच काय तो विचार कर.

तूं कदाचित् म्हणशील कीं हा वेडा अखेर कंटाळेल आणि मुकाट्यानें निघून जाईल ...

पण तसें होणार नाहीं.

देवा, जर का मला चुकवून जाशील, तर सांभाळ ; तुला धरून आणीन आणि भक्तिभावाच्या मजबूत प्रेमरज्जूनें तुझे पाय ताबडतोब बांधून टाकीन.

विठ्ठला, आतां बोल काय तें. मला भेट देण्यांतच तुझें सर्वस्वीं भलें आहे.

पाहूं द्यारे मज विठोबाचें मुख ।
लागलिसे भूक डोळां माझ्या ॥ १ ॥

कस्तुरी कुंकुम भरोनिया ताटीं ।
अंगीं बरवीं उटी गोपाळाच्या ॥ २ ॥

जाईजुई पुष्पें गुंफोनिया माळा ।
घालूं घननीळा आवडीनें ॥ ३ ॥

नामा म्हणे विठो पंढरीचा राणा ॥
डोळियां पारणें होत असे ॥ ४ ॥

विठ्ठलाचें ध्यान पाहाण्यासाठीं माझे डोळ कसे अगदीं आतुर झाले आहेत– मला पाहूं द्या हो तें !

कस्तूरीमय कुंकुमाचीं ताटें भरून आपण गोपाळाच्या अंगाला त्याची सुंदर उटी लावूं.

जाईजुईच्या फुलांच्या माळा गुंफून प्रेमानें त्या घननीळाच्या गळ्यांत घालूं.

पंढरीनाथ विठोबाच्या दर्शनानें डोळ्यांचें पारणें फिटत आहे.

नामदेव

देह जावो अथवा राहो ।
पांडुरंगीं दृढ भावो ॥ १ ॥

चरण न सोडी सर्वथा ।
आण तुझी पंढरीनाथा ॥ २ ॥

वदनीं तुझें मंगल नाम ।
हृदयीं अखंडित प्रेम ॥ ३ ॥

नामा म्हणे केशवराजा ।
केला नेम चालवी माझा ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 38८८3 वि: काव्य
क्रमांक ९६२१ नों दि २५।५।६८

पांडुरंगा, हा देह जावो अथवा राहो, तुझ्या ठिकाणीं माझी दृढनिष्ठा असूं दे.

तुझी शपथ, पंढरीनाथा मी तुझे पाय आतां केव्हांही सोडणार नाहीं.

मुखांत तुझें मंगल नाम आणि हृदयांत तुजबद्दल अखंड प्रेम ठेवीन, ही माझी प्रतिज्ञा आहे. केशवा, ती तूं सिद्धीस ने.

नाचूं कीर्तनाचे रंगीं ।
ज्ञानदीप लावूं जगीं ॥ १ ॥
सर्व सांडूनी माझाई ।
वाचे विठ्ठल रखुमाई ॥ २ ॥
परेहुन परतें घर ।
तेथें राहूं निरंतर ॥ ३ ॥
सर्वांचें जें अधिष्ठान
तेंचि माझें रूप पूर्ण ॥ ४ ॥
अवघी सत्ता आली हाता ।
नामयाचा खेचर दाता ॥ ५ ॥

कीर्तनाच्या रंगांत नाचूं आणि जगांत ज्ञानदीप तेवत ठेवूं.

मीं–माझा, हा भाव सोडून देऊं आणि वाचेनें विठ्ठलरखुमाईच्या नांवाचा जयघोष करूं.

परावाणीलाही ज्याचें वर्णन करतां येत नाहीं, तो विठ्ठल आमचें निवासस्थान आहे. तेथें आम्ही निरंतर वास करूं.

अखिल विश्वाचा जो आधार त्या परब्रह्माचें पूर्ण स्वरूप म्हणजेच माझा हा विठ्ठल आहे.

खेचरस्वामींच्या कृपाप्रसादानें अवघ्या विश्वाची सत्ता आतां माझ्या हातीं आली आहे : मला विठ्ठलाची प्राप्ति झाली आहे.

अणुमाजी राम रेणुमाजी राम ।
तृण काष्ठीं राम वर्ततसे ।। १ ।।

बाहीजुंभीतरीं राम चराचरीं ।
विश्वीं विश्वाकारीं व्यापलासे ।। २ ।।

रामेविण स्थळ रितेंचि पै नाहीं ।
वर्ते सर्वांठायीं राम माझा ।। ३ ।।

ब्रह्मा विष्णु रुद्र मूर्ती पै जे ध्यानीं ।
अखंड जपती रामनाम ।। ४ ।।

परिसा भागवत कायावाचामनें ।
श्रीरामावांचूनि आन नेणें ।। ५ ।।

अणुरेणूंत राम भरलेला आहे. तृणांत, काष्ठांत रामाचें वास्तव्य आहे. सर्व चराचर वस्तूंत, आंतबाहेर सर्वत्र तो आहे. त्यानें अखिल विश्व आपल्या विश्वरूपानें व्यापून टाकलें आहे.

रामाशिवाय मोकळें असें एकही ठिकाण सापडणार नाहीं. माझा राम सर्वत्र वास करीत आहे.

ब्रह्मा, विष्णु, रुद्र, हे आपल्या ध्यानांत रामनामाचाच जप करीत असतात.

श्रीरामांवांचून मी दुसरें कांहींही जाणीत नाहीं.

येग येग विठाबाई ।
माझे पंढरीचे आई ।। १ ।।

भीमा आणि चंद्रभागा ।
तुझ्या चरणींच्या गंगा ।। २ ।।

इतुक्यांसहित त्वां बा यावें ।
माझ्या रंगणीं नाचावें ।। ३ ।।

माझा रंग तुझे गुणीं ।
म्हणे नामयाची जनी ।। ४ ।।

ये, माझे पंढरीचे आई विठाबाई, इकडे ये. आपल्या पावलांपासून निघालेल्या भीमा आणि चंद्रभागा ह्या पवित्र नद्यांना बरोबर घेऊन ये, आणि माझ्या कीर्तनाच्या रंगणांत नाचूं लाग.

मी तुझ्या नामसंकीर्तनांत रंगून गेले आहें.

विठो माझा लेंकुरवाळा । संगें लेंकुरांचा मेळा ।। १ ।।

निवृत्ति हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।। २ ।।

पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ।। ३ ।।

गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ।। ४ ।।

बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ।। ५ ।।

जनी म्हणे रे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।। ६ ।।

माझा लेकुरवाळा विठू आपल्या लेकरांच्या मेळ्यांत कसा रंगून गेला आहे पाहा !

खांद्यावर निवृत्ति बसला आहे, सोपानाचा त्यानें हात धरला आहे, पुढें ज्ञानेश्वर आणि मागें चिमुकली मुक्ताबाई चालली आहे.

विठूच्या मांडीवर गोराकुंभार आणि लाडका चोखा खेळत आहेत. बंका कडेवर असून नाम्यानें करंगळी धरली आहे.

बा गोपाळा, राहा, असाच आपल्या भक्तांचें कोडकौतुक करण्यांत दंग राहा.

## ज ना बा ई

गंगा गेली सिंधूपासीं ।
त्याणें अव्हेरिलें तिसी ॥ १ ।

तरी तें सांगावें कवणाला ।
ऐसें बोले गा विठ्ठला ॥ २ ॥

जळ काय जळचरा ।
माता अव्हेरी लेंकुरा ॥ ३ ॥

जनी म्हणे शरण आले ।
अव्हेरितां ब्रीद गेलें ॥ ४ ॥

बा विठ्ठला, सांग पाहूं, गंगा सागरापाशीं गेली आणि त्यानें तिचा अव्हेर केला, तर त्याची तक्रार कुणाजवळ करायची !

पाणी माशाला कधीं नको म्हणतें का ? माता लेंकराला कधीं दूर लोटते का ?

देवा, मी तुला शरण आलें आहें. माझा अव्हेर करशील तर तुलाच कमीपणा येईल.

आंधळ्याची काठी ।
आडकली कवणे बेटीं ॥ १ ॥
माझिये हरणी ।
गुंतलीस कवणे रानीं ॥ २ ॥
मुकें मी पाडस ।
चुकलें भोवें पाहें वास ॥ ३ ॥
तुजवीण काय करूं ।
प्राण किती कंठीं धरूं ॥ ४ ॥
आतां जीव जाऊं पाहे ।
धांव घाली माझे आये ॥ ५ ॥
माझी भेटवा जननी ।
संतां विनवी दासी जनी ॥ ६ ॥

आंधळ्याची काठी कोणत्या जाळींत अडकली बरें !

माझे हरिणी, कोणत्या रानांत तूं सांपडली आहेस ?

तुझें हें मुकें पाडस चुकून भोवऱ्यांत पडलें आहे.

तुझ्याशिवाय मी काय करूं ? किती वेळ प्राण कंठीं धरून बसूं ?

आतां जीव जाऊं पाहात आहे. आई, माझे आई, आतां धाव घे.

संत हो, माझी विनवणी ऐका, मला माझ्या आईची भेट करवा.

पक्षी जाय दिगंतरा ।
बाळकासी आणि चारा ॥ १ ॥

घार हिंडते आकाशीं ।
झांप घाली पिलांपाशीं ॥ २ ॥

माता गुंतली कामासी ।
चित्त तिचें बाळापासीं ॥ ३ ॥

वानर हिंडे झाडावरी ।
पिलीं बांधूनी उदरीं ॥ ४ ॥

तैसी आम्हां विठ्ठलमाये ।
जनी वेळोवेळां पाहे ॥ ५ ॥

पक्षी दूर दूर जाऊन पिलांसाठीं चारा घेऊन येत असतात.

घार आकाशांत घिरट्या घालीत असते, तरीपण एकदम झेप घालून पिलांपाशीं येते.

माता आपल्या कामांत गुंतली असली तरी तिचें सारें लक्ष बाळापाशीं असतें.

वानरी पिलांना पोटापाशीं आवळून घेऊन ह्या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत असते...

तसेंच, विठ्ठलमाये, तूं आमच्याकडे वेळोवेळीं वात्सल्यानें पाहात राहा.

धरिला पंढरीचा चोर ।
प्रेमें बांधोनियां दोर ॥ १ ॥

हृदय बंदिशाळा केलें ।
आंत विठ्ठला कोंडिलें ॥ २ ॥

शब्दें केली जडाजोडीं ।
पायीं विठ्ठलाच्या बेडी ॥ ३ ॥

सोऽहं शब्दें मारा केला ।
विठ्ठल काकुळती आला ॥ ४ ॥

जनी म्हणे गा विठ्ठला ।
आतां जीवें न सोडिं तुला ॥ ५ ॥

पंढरीच्या त्या चोराला मीं प्रेमरज्जूनें बांधून धरून आणिलें, त्याला हृदयाच्या बंदिशाळेंत कोंडून ठेविलें, शब्दांची सांखळी बनवून तिची बेडी त्याच्या पायांत ठोकली, आणि 'सोऽहं' ह्या मंत्राचा मारा करून त्याला बेजार केलें.

अरे विठ्ठला, मी तुला आतां असा सोडणार नाहीं.

ना रा

देवा माझें मीपण ठेवीं आपुले चरणीं ।
घालीं माझे मनीं रूप तुझें ॥ १ ॥
मग मी लोकाचारीं असेन वर्तता ।
राहीन चिंतिता चरण तुझे ॥ २ ॥
चंदनाची वृत्ति वेधले तरुवर ।
सबाह्य अभ्यंतर काय झाले ॥ ३ ॥
सरिता सिंधूसी मिळोनि हरपली ।
सागरची झाली एकसरें ॥ ४ ॥
लवण जळाचे प्रवृत्ति जसे ।
ऐक्यभावें न दिसे वेगळें कांहीं ॥ ५ ॥
नारा म्हणे शरण आलों केशिराजा ।
ऐसा भाव माझा करीं गा वेगीं ॥ ६ ॥

देवा, माझा मीपणा आपल्या चरणांपाशीं ठेवून घे, आणि तुझें रूप माझ्या मनांत ओत. म्हणजे मग मी जरी व्यवहारांत वावरत असलों तरी तुझ्या पायांचें चिंतन करीत राहीन.

परिमळ पसरविण्याची वृत्ति अंगीं बाणलेले चंदनाचे वृक्ष अन्तर्बाह्य सुवासानें भरलेले असतात.

सरिता सागराला मिळाली कीं स्वत्व विसरून त्याच्याशीं एकरूप बनते.

पाण्यांत पडलेलें मीठ पाण्यासारखें होतें, मुळींसुद्धा वेगळें राहात नाहीं.

देवा, माझ्या मनांत तुजविषयींचा ऐक्यभाव त्वरित निर्माण होऊं दे. मी तुला शरण आहें.

तारीं मज आतां रखुमाईच्या कांता ।
पंढरीच्या नाथा मायबापा ।। १ ।।

अनाथाचा नाथ ऐकियेलें कानीं ।
सनकादिक मुनि बोलताती ।। २ ।।

त्यांचिया वचनाचा पावोनि विश्वास ।
धरिली तुझी कास पांडुरंगा ।। ३ ।।

नामयाची लेकी लिंबाई म्हणे देवा ।
कृपाळू केशवा सांभाळावें ।। ४ ।।

हे रुक्मिणीपते पंढरीराया, मायबापा, आतां मला वांचीव.

तूं अनाथांचा नाथ आहेस, असें सनकादिक मुनींनीं म्हटलें असल्याचें मीं आपल्या कानांनीं ऐकिलें आहे. त्यांच्या शब्दाचा विश्वास वाटून, पांडुरंगा, मीं तुझी कांस धरली आहे.

तर देवा, केशवा कृपाळा, मला सांभाळ.

अनाथाचा नाथ दीनाचा दयाळ ।
म्हणोनि सांभाळ करीं माझा ॥ १ ॥

तुजऐसा देव नाहीं त्रिभुवनीं ।
म्हणऊनी चरणीं विनटलें ॥ २ ॥

बापा विठ्ठलराया करीं कृपादान ।
सांभाळीं वचन आपुलें तें ॥ ३ ॥

लाडाई म्हणे देवा भेट देईं वेगीं ।
ब्रीद तुझें जगीं दीननाथ ॥ ४ ॥

देवा, तूं आपल्याला अनाथांचा नाथ, दीनांचा दयाळ असें म्हणवितोस, तर आतां माझा सांभाळ कर.

साऱ्या त्रिभुवनांत तुझ्यासारखा देव नाहीं, म्हणून मी तुझ्या पायीं चिकटलें आहें.

बापा विठ्ठलराया, मला कृपेची भिक्षा घाल. आपलें बिरुद सत्य कर.

देवा, मला आतां ताबडतोब भेट दे आणि दीननाथ असें जें तुझें ब्रीद आहे त्याला जाग.

ऊंस डोंगा परी रस नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ॥ १ ॥

कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ॥ २ ॥

नदी डोंगी परी जळ नोहे डोंगें ।
काय भुललासी वरलिया सोंगें ॥ ३ ॥

चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ॥ ४ ॥

बाबारे, वरल्या रंगानें कां फसतोस ? फसूं नकोस. पाहा...

ऊस वेडावाकडा असला तरी त्याचा रस गोड असतो.

कमान तिरकी, पण त्यांतून सोडलेला बाण सरळ जातो.

नदी वेडीवाकडी वाहात गेली तरी तिचें पाणी निर्मळ असतें.

म्हणून, बा प्राण्या, बाह्य रंगाला भुलूं नकोस. लक्षांत ठेव. चोखा हीन असला तरी त्याचा भाव शुद्ध आहे.

अनादि निर्मळ वेदांचें जें मूळ ।
परब्रह्म सोज्वळ विटेवरी ।। १ ।।

कर दोन्ही कटीं राहिलासे उभा ।
नीळवर्ण प्रभा फांकतसे ।। २ ।।

आनंदाचा कंद पाउलें साजिरीं ।
चोखा म्हणे हरी पंढरीये ।। ३ ।।

अनादि, निर्मळ, आणि विश्वाचें आदिकरण असें ज्याचें वेदांनीं वर्णन केलें आहे तें परब्रह्म येथें सुंदर रूप घेऊन विटेवर उभें आहे.

त्यानें आपले दोन्ही हात कमरेवर ठेविले असून नीलवर्णाची प्रभा त्याच्या भोवतीं फाकली आहे.

हे पंढरिनाथा हरि, तुझीं पावलें गोजिरवाणीं असून तूं आनंदाचा कंद आहेस.

मज तों नवल वाटतसे जीवीं ।
आपुली पदवी विसरलें ॥ १ ॥

कवणिया सुखा परब्रह्म भुललें ।
गुंतोनी राहिलें भक्तभाके ॥ २ ॥

निर्गुण होतें तें सगुण पैं जालें ।
विसरोनी गेलें आपआपणा ॥ ३ ॥

चोखा म्हणे ऐसा कैसा हा नवलाव ।
देवाधिदेव वेडावला ॥ ४ ॥

परब्रह्माला आपल्या पदाचा विसर कसा पडला याचें तर माझ्या मनाला मोठें नवल वाटतें.

कोणत्या सुखाला भुलून तें येथें पंढरीच्या वाळवंटांत भक्तांच्या वचनांत अडकून पडलें आहे बरें !

स्वस्वरूपाचा विसर पडून, मुळांत निर्गुण असलेलें तें परब्रह्म येथें सगुण झालें आहे.

काय हा चमत्कार पाहा कीं देवाधिदेव येथें वेडावून गेला आहे.

सो य रा बा ई

येईं येईं गरुडध्वजा । विटेसहित करीन पूजा ।। १ ।।

धूप दीप पुष्पमाळा । तुज समर्पूं गोपाळा ।। २ ।।

पुढें ठेवोनियां पान । वाढी कुटुंबी तें अन्न ।। ३ ।।

तुम्हां योग्य नव्हे देवा । गोड करूनियां घेवा ।। ।।

विदुराघरच्या पातळ कण्या । खासि मायबापा धन्या ।। ५ ।।

द्रौपदीच्या भाजीपाना । तृप्ति झाली नारायणा ।। ६ ।।

तैसी झाली येथें परी । म्हणे चोखयाची महारी ।। ७ ।।

हे गरुडध्वजा विष्णो, ये इकडे ये. मी तुझी आपादमस्तक पूजा करीन.

गोपाळा, तुला धूपदीप आणि फुलांच्या माळा अर्पण करीन.

तुझ्यापुढें पान मांडून आम्हा गरिबाघरच अन्न तुला वाढीन.

देवा, तें तुमच्या योग्यतेचें नसलें तरी ते गोड करून घ्या.

मायबापा धन्या, विदुराघरच्या पातळ कण्या तुम्ही खाल्ल्यात, द्रौपदीनें दिलेल्या भाजीच्या नुसत्या पानानें तुमची तृप्ति झालीं.

तीच गत येथें माझ्या घरीं होऊं द्या ... माझें गरिबाचें अन्न प्रेमानें स्वीकारा.

नाहीं प्रेमभाव न कळे मान्यता।
सलगी बोलतां सुख वाटे॥ १॥

अखंड नामावळी गाईन वेळोवेळीं।
नित्य ती दिवाळी आम्हां घरीं॥ २॥

संतसमागम वैष्णवांचा हाट।
पंढरीये पेठ दुमदुमली॥ ३॥

बंका म्हणे सुख तयांचे संगतीं।
बैसेन पंगतीं हरिदासां॥ ४॥

देवा, माझ्या ठिकाणीं प्रेम नाहीं, तुझा महिमा थोर हेंही मला कळत नाहीं मात्र तुझ्याशीं सलगीनें बोलण्यांत मला सुख वाटतें.

वळोवेळीं तुझ्या नांवाचा अखंड जप करीन, त्यात मला नेहमींच दिवाळी साजरी केल्याचा आनंद वाटेल.

वैष्णवांच्या जत्रेंत संतजन एकत्र जमले आहेत. पंढरीची पेठ गजबजून राहिली आहे.

हरिभक्तांच्या सहवासांत सुख असल्यामुळें मी त्यांच्या मेळ्यांत सामील होईन.

## निर्मळाबाई

नाहीं मज आशा आणीक कोणाची।
स्तुति मानवाची करुनी काय ॥ १ ॥

काय हे देतील नाशवंत सारे।
यांचें या विचारें यांसी न पुरे ॥ २ ॥

ऐसें ज्याचें देणें कल्पांतीं न सरे।
तेंचि एक बरें आम्हांलागीं ॥ ३ ॥

जो भक्तांचा विसांवा वैकुंठनिवासी ।
तो पंढरीसी उभा विटे ॥ ४ ॥

निर्मळा म्हणे सुखाचा सागर।
लावण्यआगर रूप ज्याचें ॥ ५ ॥

मला दुसऱ्या कोणापासून कसलीही अपेक्षा नाहीं. माणसांची स्तुति करून मला काय मिळणार! ते देतील तें सारें नाशवंत असणार. तसें पाहातां त्यांचें त्यांनाच तें पुरत नसतें.

जें धन कल्पांतींही संपणार नाहीं, त्यामागेंच लागणें बरें.

तें धन देणारा भक्तांचा विसावा असा तो वैकुंठनिवासी भगवान येथें पंढरीस विटेवर उभा आहे.

तो सुखाचा केवळ सागरच असून त्याचें रूप म्हणजे लावण्याचें आगर आहे.

## सोनार नरहरी

शिव आणि विष्णु एकाचि प्रतिमा ।
ऐसा ज्याचा प्रेमा सदोदीत ॥ १ ॥

धन्य ते संसारीं नर आणि नारी ।
वाचे हरहरि उच्चारिती ॥ २ ॥

नाहीं पै तो भेद अवघाची अभेद ।
द्वेषाद्वेषसंबंधा उरी नुरे ॥ ३ ॥

सोनार नरहरी न देखे द्वैत ।
अवघा मूर्तिमंत एकरूप ॥ ४ ॥

शिव आणि विष्णु दोघे एकच अशी ज्यांची नेहमींची भावना, आणि जे वाचेनें हर आणि हरि ह्या दोन्ही नामांचा जप करीत असतात, ते स्त्री–पुरुष ह्या जगांत धन्य होत. ज्यांच्या दृष्टीला कोठेंही भेद दिसत नाहीं, सर्वत्र ऐक्य दिसत असतें, त्यांच्या ठायीं रागलोभादि विकारांना जागाच उरत नाहीं.

मला कोठेंही द्वैत दिसत नाहीं. सर्वत्र मूर्तिमंत एकच देव दिसतो.

## सां व ता मा ळी

कांदा मुळा भाजी ।
अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥

लसूण मिरची कोथिंबिरी ।
अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥

ऊंस गाजर रताळू ।
अवघा झालासे गोपाळू ॥ ३ ॥

मोट नाडा विहीर दोरी ।
अवघी व्यापिली पंढरी ॥ ४ ॥

सांवता म्हणे केला मळा ।
विठ्ठल पायीं गोविला गळा ॥ ५ ॥

हा कांदा, हा मुळा, ही भाजी सर्व कांहीं माझी विठाबाई आहे.

माझा हरिच लसूण, मिरची, कोथिंबीर झाला आहे.

गोपाळ, ऊस, गाजर, रताळें बनला आहे.

मोट, नाडा, विहीर, दोरी, ह्या साऱ्या अवजारांनीं अवघी पंढरी व्यापून टाकिली आहे.

विठ्ठलामुळेंच मळ्याचा हा पसारा मीं आपल्या गळ्यांत अडकवून घेतला आहे.

अग्नि जाळी तरी न जळे प्रल्हादु ।
हृदयीं गोविंदु म्हणोनियां ॥ १ ॥
अग्नि जाळी तरी न जळती गोपाळ ।
हृदयीं देवकीबाळ म्हणोनियां ॥ २ ॥
अग्नि जाळी तरी न जळती पांडव ।
हृदयीं वासुदेव म्हणोनियां ॥ ३ ॥
अग्नि जाळी तरी न जळे बिभीषणाचें घर ।
हृदयीं सीतावर म्हणोनियां ॥ ४ ॥
जगमित्र नागा न जळे जरि अग्नी जाळी ।
हृदयीं वनमाळी म्हणोनियां ॥ ५ ॥

प्रल्हादाला अग्निकुंडांत टाकलें तरी तो जळला नाहीं; कारण त्याला गोविंदाचा ध्यास लागलेला होता.

गोपाळ वणव्यांत सापडले पण त्यांतून ते सुरक्षित बाहेर पडले; कारण देवकीचा बाळ श्रीकृष्ण त्यांच्याबरोबर होता.

कौरवांनीं लाक्षागृहाला आग लाविली, पण पांडव त्यांतून वांचले. कारण वासुदेव त्यांच्या पाठीशीं होता.

अवघी लंका पेटली पण बिभीषणाचा वाडा मात्र जळला नाहीं; कारण सीतावर रामचंद्राचा तो भक्त होता.

तद्वतच, दुष्टांनीं घर पेटविलें पण जगमित्र नागाला इजा झाली नाहीं, ह्याचें कारण म्हणजे तो आपल्या अन्तर्यामीं श्रीहरीचें अखंड स्मरण करीत होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92608
(स्थळ प्रत)

कांदा मुळा भाजी ।
अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥

लसूण मिरची कोथिंबिरी ।
अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥

ऊंस गाजर रताळू ।
अवघा झालासे गोपाळू ॥ ३ ॥

मोट नाडा विहीर दोरी ।
अवघी व्यापिली पंढरी ॥ ४ ॥

सांवता म्हणे केला मळा ।
विठ्ठल पायीं गोविला गळा ॥ ५ ॥

हा कांदा, हा मुळा, ही भाजी सर्व कांहीं माझी विठाबाई आहे.

माझा हरिच लसूण, मिरची, कोथिंबीर झाला आहे.

गोपाळ, ऊस, गाजर, रताळें बनला आहे.

मोट, नाडा, विहीर, दोरी, ह्या साऱ्या अवजारांनीं अवघी पंढरी व्यापून टाकिली आहे.

विठ्ठलामुळेंच मळ्याचा हा पसारा मीं आपल्या गळयांत अडकवून घेतला आहे.

## ज ग मि त्र ना गा

अग्नि जाळी तरी न जळे प्रल्हादु ।
हृदयीं गोविंदु म्हणोनियां ॥ १ ॥
अग्नि जाळी तरी न जळती गोपाळ ।
हृदयीं देवकीबाळु म्हणोनियां ॥ २ ॥
अग्नि जाळी तरी न जळती पांडव ।
हृदयीं वासुदेव म्हणोनियां ॥ ३ ॥
अग्नि जाळी तरी न जळे बिभीषणाचें घर ।
हृदयीं सीतावर म्हणोनियां ॥ ४ ॥
जगमित्र नागा न जळे जरि अग्नी जाळी ।
हृदयीं वनमाळी म्हणोनियां ॥ ५ ॥

प्रल्हादाला अग्निकुंडांत टाकलें तरी तो जळला नाहीं; कारण त्याला गोविंदाचा ध्यास लागलेला होता.

गोपाळ वणव्यांत सापडले पण त्यांतून ते सुरक्षित बाहेर पडले; कारण देवकीचा बाळ श्रीकृष्ण त्यांच्याबरोबर होता.

कौरवांनीं लाक्षागृहाला आग लाविली, पण पांडव त्यांतून वांचले. कारण वासुदेव त्यांच्या पाठीशीं होता.

अवघी लंका पेटली पण बिभीषणाचा वाडा मात्र जळला नाहीं; कारण सीतावर रामचंद्राचा तो भक्त होता.

तद्वतच, दुष्टांनीं घर पेटविलें पण जगमित्र नागाला इजा झाली नाहीं, ह्याचें कारण म्हणजे तो आपल्या अन्तर्यामीं श्रीहरीचें अखंड स्मरण करीत होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92६०e
दि ५१ ६७

## से ना न्हा वी

कळेल तैसें गाईन तुज ।
नाहीं जनासवें काज ॥ १ ॥

स्तुती करीन आवडी ।
जैसी जीवा वाटे गोडी ॥ २ ॥

नाम गाईन आनंदें ।
नाचेन आपुलाले छंदें ॥ ३ ॥

सेना म्हणे नाहीं ।
जनासवें काज कांहीं ॥ ४ ॥

येईल तसें मी तुझें गाणें गाईन; मला लोकांशीं काय करायचें आहे ?

मनाला गोड वाटेल तशी मी प्रेमानें तुझी स्तुति करीन. आनंदानें तुझें नामसंकीर्तन करीत आपल्याच नादांत तल्लीन होऊन नाचूं लागेन.

मला लोकांशीं कांहीं कर्तव्य नाहीं.

चित्तीं पाय रूप डोळां ।
मुखीं नाम वेळोवेळां ॥ १ ॥

हेंचि मागें तुजपाशीं ।
भाव खरा कीं जाणसी ॥ २ ॥

हें उचित तुमचें ।
कोड पुरवा बालकाचें ॥ ३ ॥

नको देऊं अंतर ।
सेना लोळे पायांवर ॥ ४ ॥

देवा, माझें चित्त तुझ्या पायांवर जडलेलें असो, डोळे तुझें रूप न्याहाळण्यांत गुंतलेले असोत आणि मुखावाटे सदैव तुझा नामोच्चार होत असो, एवढेंच माझें तुजपाशीं मागणें आहे. माझा भाव खरा कीं खोटा हें तूं जाणत आहेसच.

देवा, ह्या बालकाचा हट्ट पुरवावा हेंच तुम्हांला उचित आहे.

मला अंतर देऊं नका. मी तुमच्या पायांवर लोटांगण घालीत आहें.

सेना न्हावी

येथें सुखाचिये राशी ।
पार नाहीं त्या भाग्यासी ॥ १ ॥

सुख झालें आलिंगनें ।
कांती निवाली दर्शनें ॥ २ ॥

उपकार उत्तीर्णता ।
सेना म्हणे नाहीं आतां ॥ ३ ॥

येथें सुखाच्या राशी आहेत. आतां आमच्या भाग्याला पार नाहीं.

देवा, तुमच्या भेटीनें सुख झालें; दर्शनानें काया निवाली.

आतां उपकार आणि उतराई होणें या गोष्टी उरल्याच नाहींत.

## का न्हो पा ठ क

वेद गणितां मर्यादला ।
तरि तूं अगाध बा विठ्ठला ॥ १ ॥

येवढें माप कैचें थोर ।
ज्याणें उमाणे तुमचा पार ॥ २ ॥

शेष वर्णितां श्रमला ।
जिव्हा दुखंड होउनि ठेला ॥ ३ ॥

म्हणौनि कान्हो पाठक उगा ।
मौनें मवी पांडुरंगा ॥ ४ ॥

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३६८८३ वि: काव्य
क्रमांक ९६२१ नों. दि. १५/११/६२

बा विठ्ठला ! तुझ्या मोठेपणाचें मोजमाप करतांना वेदाची मति कुंठित झाली, इतका तूं अगाध आहेस.

तुझा ठाव घेतां येईल एवढें मोठें माप तरी कोठून आणायचें !

तुझें वर्णन करतांना शेष थकला. बिचाऱ्याच्या जिभेचे तुकडे पडले.

म्हणून पांडुरंगा, मी आपला गप्पच आहें.

तुझें चिंतन मुकाट्यानें करीत आहें.

जेवीं लग्नघडी साधिती वऱ्हाडी ।
तैसी माझी घडी सांभाळावी ॥ १ ॥

जेवीत असला आंचवाया येई ।
तरी विठाबाई होय भेटी ॥ २ ॥

हातींचा तांबूल मुखीं नका घालूं ।
फार काय बोलूं पांडुरंगा ॥ ३ ॥

मालो म्हणे मज घालावें पाठीसी ।
ठाव पायांपाशीं देई देवा ॥ ४ ॥

देवा, वऱ्हाडी मंडळी जशी लग्नघडी साधीत असतात, तशी तुम्ही माझी घडी सांभाळा.

विठाबाई, जेवीत असाल तर आंचवायला येथें या, तरच आपली भेट होईल.

पांडुरंगा, फार काय सांगूं! हातांतील विडा तोंडांत घालूं नका, ताबडतोब इकडे या, माझी घडी सांभाळा.

मला पाठीशीं घाला. देवा, आपल्या पायांपाशीं मला ठाव द्या.

भा गू बा ई

आलों तुझ्या दर्शनासी ।
भेट द्यावी बा आम्हासी ।। १ ।।

सर्व संत हो राउळीं ।
मी रे येकली तळमळी ।। २ ।।

करुणा आईक विठाई ।
मज बाळा भेट देईं ।। ३ ।।

देव आले हो बाहेरी ।
मज नेलें खांद्यावरी ।। ४ ।।

भागु म्हणे भेट झाली ।
माझी चिंता ही हारली ।। ५ ।।

देवा, तुझ्या दर्शनासाठीं आलों आहें. मला भेट दे.

सारी संत मंडळी देवळांत जमली आहेत. मी एकटीच रे बाहेर तळमळत उभी आहें.

आई विठाई, ऐक, दया कर, माझी हाक ऐक. मला बाळाला भेट दे.

काय सांगूं! देव बाहेर आले हो!! आणि मला खांद्यावरून घेऊन आंत गेले!!!

देव भेटले आणि माझी चिंता दूर झाली.

जेवीं लग्नघडी साधिती वऱ्हाडी ।
तैसी माझी घडी सांभाळावी ॥ १ ॥

जेवीत असला आंचवाया येई ।
तरी विठाबाई होय भेटी ॥ २ ॥

हातींचा तांबूल मुखीं नका घालूं ।
फार काय बोलूं पांडुरंगा ॥ ३ ॥

मालो म्हणे मज घालावें पाठीसी ।
ठाव पायांपाशीं देई देवा ॥ ४ ॥

देवा, वऱ्हाडी मंडळी जशी लग्नघडी साधीत असतात, तशी तुम्ही माझी घडी सांभाळा.

विठाबाई, जेवीत असाल तर आंचवायला येथें या, तरच आपली भेट होईल.

पांडुरंगा, फार काय सांगूं! हातांतील विडा तोंडांत घालूं नका, ताबडतोब इकडे या, माझी घडी सांभाळा.

मला पाठीशीं घाला. देवा, आपल्या पायांपाशीं मला ठाव द्या.

आलों तुझ्या दर्शनासी ।
भेट द्यावी बा आम्हासी ॥ १ ॥

सर्व संत हो राउळीं ।
मी रे येकली तळमळी ॥ २ ॥

करुणा आईक विठाई ।
मज बाळा भेट देईं ॥ ३ ॥

देव आले हो बाहेरी ।
मज नेलें खांद्यावरी ॥ ४ ॥

भागु म्हणे भेट झाली ।
माझी चिंता ही हारली ॥ ५ ॥

देवा, तुझ्या दर्शनासाठीं आलों आहें. मला भेट दे.

सारी संत मंडळी देवळांत जमली आहेत. मी एकटीच रे बाहेर तळमळत उभी आहें.

आई विठाई, ऐक, दया कर, माझी हाक ऐक. मला बाळाला भेट दे.

काय सांगूं! देव बाहेर आले हो!! आणि मला खांद्यावरून घेऊन आंत गेले!!!

देव भेटले आणि माझी चिंता दूर झाली.

पतितपावन म्हणविसी आधीं ।
तरी कां उपाधि भक्तांमागें ॥ १ ॥

तुझें म्हणवितां दुजे अंगसंग ।
उणेपणा सांग कोणाकडे ॥ २ ॥

सिंहाचें भातुकें जंबुक पैं नेतां ।
थोराचिया माथा लाज वाटे ॥ ३ ॥

म्हणे कान्होपात्रा देह समर्पणें ।
करावा जतन ब्रीदासाठीं ॥ ४ ॥

देवा, तूं स्वतःला प्रथम पतितपावन म्हणवितोस, तर मग भक्तांमागें उपाधि कां लागाव्यात ?

मी आपल्याला तुझी असें म्हणविल्यावर मग जर दुसऱ्या कोणीं माझ्या अंगाला स्पर्श केला तर त्यांत कमीपणा कोणाला ? तुलाच नाहीं का ?

सिंहाची शिकार कोल्ह्यानें पळविली तर त्याची लाज सिंहालाच वाटली पाहिजे.

मीं माझें सर्वस्व तुलाच अर्पण केलें आहे, आतां माझें रक्षण कर आणि आपलें ब्रीद राख.

नको देवराया अंत पाहूं आतां ।
प्राण हा सर्वथा फुटों पाहे ॥ १ ॥

हरिणीचें पाडस व्याघ्रें धरियेलें ।
मजलागीं जाहलें तैसें देवा ॥ २ ॥

तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनीं ।
धांवें हो जननी विठाबाई ॥ ३ ॥

मोकलोनी आस जालें मी उदास ।
घेई कान्होपात्रेस हृदया आंत ॥ ४ ॥

देवराया, आतां अंत पाहूं नकोस; माझे प्राण कंठीं आले आहेत.

देवा, हरणाच्या पाडसाला वाघानें धरावें, तशी माझी गत झाली आहे.

आई विठाबाई, धाव; आतां ह्या त्रिभुवनांत तुझ्याशिवाय मला दुसरें ठिकाण दिसत नाहीं.

देवा, सारी आशा गमावून आतां मी पूर्ण निराश झालें आहें. मला आपल्या पोटांत घे.

भा नु दा स

चतुर्भुज मूर्ति लावण्य रूपडें ।
पाहतां आवडे जीवा बहु ॥ १ ॥

वैजयन्ती माळा किरीट कुंडलें ।
भूषण मिरविले मकराकार ॥ २ ॥

कासे सोनसळा पीतांबर पिवळा ।
कस्तुरीचा टिळा शोभे माथां ॥ ३ ॥

शंख चक्र हातीं पद्म तें शोभलें ।
भानुदासें वंदिलें चरणकमळ ॥ ४ ॥

ह्या सुंदर चतुर्भुज मूर्तीचें मोहक ध्यान पाहून जिवाला फार संतोष होतो.

गळ्यांत तुळशीमाळा, डोक्यावर मुकुट, कानांत मकर कुंडलें, कमरेला जरीकांठी पीतांबर, कपाळाला कस्तुरीचा टिळा, आणि हातांत शंख, चक्र, कमळ; अशी ही मूर्ति किती शोभिवंत दिसत आहे !

तिच्या चरणकमलांना माझें वंदन असो.

नागरें गोमटें रूप तें गोजिरें ।
उभें तें साजिरें भीमातटीं ॥ १ ॥

पाहतां विश्रांती देहा होय शांति ।
अनुपम्य मूर्ति विठ्ठलदेव ॥ २ ॥

भक्ताचिया काजा राहिलासे उभा ।
कैवल्याचा गाभा बालमूर्ति ॥ ३ ॥

आनंदाचा कंद उभा परमानंद ।
एका जनार्दनीं छंद मज त्याचा ॥ ४ ॥

सुरेख, गोड आणि नाजूक असें हें शोभिवंत रूप भीमाकांठीं उभें आहे.

विठ्ठलाची ही अनुपम मूर्ति पाहिली कीं सारा शीण लयाला जाऊन देहाला शांति मिळते.

कैवल्याचा केवळ गाभाच अशी ही बालमूर्ति भक्तांना उपयोगी पडण्यासाठीं येथें उभी राहिली आहे.

आनंदाचा कंद असा हा परमानंद विठ्ठल, त्याचा मला ध्यास लागला आहे.

अणुरेणुपासुनी ब्रह्मांडीं भरला ।
तो म्यां देखिला विटेवरी ॥ १ ॥
स्थावर जंगम भरुनी उरला ।
तो म्यां देखिला पंढरीये ॥ २ ॥
वेद शास्त्र पुराणें गाती जयासाठीं ।
तो पुंडलिकापाठीं उभा दिसे ॥ ३ ॥
वेडावल्या श्रुती न कळे म्हणती ।
तो उभा श्रीपती वाळुवंटीं ॥ ४ ॥
संतांचा समागम गाती आनंदानें ।
तो हरिकीर्तनीं नाचतसे ॥ ५ ॥
एकाजनार्दनीं सुखाचा सागरू ।
विठ्ठलकल्पतरू बोळला आम्हां ॥ ६ ॥

अणुरेणूपासून ब्रह्मांडापर्यंत सर्वत्र व्यापून असलेला परमात्मा मला येथें विटेवर दिसला आहे.

वेद, शास्त्र, पुराणें ज्याचें गुणगायन करतात तो, येथें पुंडलिकाच्या पाठीशीं उभा असलेला दिसत आहे.

श्रुति भांबावून जाऊन अखेर ' नेति नेति ' असें ज्याबद्दल म्हणतात तो श्रीपति येथें वाळवंटांत उभा आहे.

संतजन एकत्र होऊन ज्याच्या नामाचा आनंदानें जयघोष करीत असतात तो येथें हरिकीर्तनांत नाचत आहे.

सुखाचा सागर असा हा कल्पतरु विठ्ठल येथें आमच्यासाठीं प्रगट झाला आहे.

देव सर्वांठायीं वसे ।
परि न दिसे अभाविकां ॥ १ ॥

जळीं स्थळीं पाषाणीं भरला ।
रिता ठाव कोठें उरला ॥ २ ॥

जिकडे पाहे तिकडे देव ।
अभाविकां दिसे वाव ॥ ३ ॥

एकाजनार्दनीं नाहीं भाव ।
तंव तया न दिसे देव ॥ ४ ॥

देव सर्व ठिकाणीं आहे; परंतु अभाविकांना तो दिसत नाहीं.

तो जळीं, स्थळीं, पाषाणीं भरला आहे. देव नाहीं अशी जागा कोठें आहे?

जिकडे पाहाल तिकडे देव आहे. अभाविकांना मात्र मोकळी जागा दिसते.

श्रद्धा नाहीं म्हणून त्यांना देव दिसत नाहीं.

येथुनी पाहें तेथवरी।
तंव तंव अवघा दिसे हरी ॥ १ ॥

आतां जाउनि कोठें पाहूं।
जेथें पाहूं तेथें देवू ॥ २ ॥

गिरिकपाटीं कंदरीं।
जिकडे पाहें तिकडे हरी ॥ ३ ॥

एका बैसला निरंजनीं।
जनार्दन जनीं वनीं ॥ ४ ॥

येथपासून तेथपर्यंत पाहा. जेथें तेथें तुम्हांला हरिच दिसेल.

आतां जाऊन कोठें पाहूं ? जेथें पाहावें तेथें देव आहेच !

दऱ्याखोऱ्यांत, रानावनांत जिकडे पाहावें तिकडे हरि आहे.

तुम्ही पाहिजे तर एकान्तांत बसा; पण जनार्दन जनांत वनांत सर्वत्र आहेच.

हृदयस्थ असोनी कां रे फिरसी वांयां
दीप आणि छाया जयापरी ॥ १ ॥

आत्मतीर्थीं सुस्नात झालिया मन।
आणिक साधन दुजें नाहीं ॥ २ ॥

साधन तें मन करीं आपुले आधीन।
यापरतें कारण आन नाहीं ॥ ३ ॥

एकाजनार्दनीं मनासी आवरीं।
मग तूं संसारीं धन्य होसी ॥ ४ ॥

दीप आणि छाया हीं नेहमीं एकत्र असतातच. तद्वत् परमेश्वर नेहमीं तुझ्या सन्निध – तुझ्या हृदयांत – असतां तूं त्याला शोधीत उगाच कां बाहेर भटकत फिरतोस ?

आपल्या अन्तर्यामींच पावन करणारें तीर्थ आहे. त्यांत स्नान करून मन निर्मळ कर. मग आणखी दुसरें साधन नको.

मन हेंच परमेश्वरप्राप्तीचें साधन आहे. तें आपल्या ताब्यांत ठेव. ह्याहून अन्य कर्तव्य नाहीं.

आपल्या मनाला आंवर, तूं जगांत धन्यता पावशील.

माझें मन अति चंचळ ।
त्यासी बांधा तुम्ही सबळ ॥ १ ॥

मग तें कोठें नव जाय ।
तुमचें सोडोनिया पाय ॥ २ ॥

सुख-दुःखाचें कारण ।
मनचि हें अधिष्ठान ॥ ३ ॥

एकाजनार्दनीं शरण ।
मनें मनासी बंधन ॥ ४ ॥

मन हें अत्यंत चंचल आहे. त्याला तुम्ही घट्ट बांधून ठेवा.

देवा, मग तें तुमचे पाय सोडून कोठेंही जाणार नाहीं.

मन हें सुखदुःखाचें कारण आहे. मनावरच सर्व व्यापार आधारलेले आहेत.

देवा, मी तुला शरण आहें. मनानेंच मनाला बंधन घाल.

काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल ।
नांदतो केवळ पांडुरंग ॥ १ ॥
भाव भक्ति भीमा उदक तें वाहे ।
बरवा शोभताहे पांडुरंग ॥ २ ॥
दया क्षमा शांति हेंचि वाळुवंट ।
मिळालासे थाट वैष्णवांचा ॥ ३ ॥
ज्ञान ध्यान पूजा विवेक आनंद ।
हाचि वेणुनाद शोभतसे ॥ ४ ॥
दश इंद्रियांचा एक मेळा केला ।
ऐसा गोपाळकाला होत असे ॥ ५ ॥
देहीं देखिली पंढरी जनीं वनीं ।
एका जनार्दनीं वारी करी ॥ ६ ॥

देह ही पंढरी असून आत्मा हा विठ्ठल आहे. पांडुरंगच देहांत नांदत असतो.

भक्तिभाव हा भीमेचा प्रवाह त्यांतून वाहात आहे. त्या कांठीं पांडुरंगाची सुंदर मूर्ति शोभून दिसत आहे.

दया, क्षमा आणि शांति हेंच त्या पंढरीचें वाळवंट असून त्यांत वैष्णवांची गर्दी जमली आहे.

ज्ञान, ध्यान, पूजा, विवेक, आनंद हा तेथें होत असलेला मधुर वेणुनाद होय.

दहाही इंद्रियें विठ्ठलाच्या चरणीं एकवटलीं आहेत. तोच तेथील गोपाळकाला.

जनांत असा, अगर वनांत असा; आपल्या देहांतच पंढरीचें दर्शन होत असतें. त्या पंढरीचीच मी वारी करीत आहे.

दीनाचा दयाळु कीर्ति ऐकियेली ।
म्हणूनि पाहिली वाट तुझी ॥ १ ॥

अनाथाचा नाथ होशील कैवारी ।
म्हणोनियां हरी बोभाईलें ॥ २ ॥

तुजविण कोण जाणे हें अंतर ।
कोणासि जौजार घालूं माझा ॥ ३ ॥

दास म्हणे आम्ही दीनाहुनी दीन ।
करावें पालन दुर्बळाचें ॥ ४ ॥

दीनांची तुला दया येते, अशी तुझी कीर्ति ऐकल्यामुळें मीं तुझी वाट पाहिली.
हे अनाथांच्या नाथा, हरि, तूं माझा कैवार घेशील म्हणून तुझा धावा केला.

तुझ्यावांचून माझें हृदय कोणाला समजणार ? मी कोणावर भार घालूं ?

देवा, आम्ही दीनाहूनही दीन आहोंत. आम्हां पामरांचें पालन कर.

कां वो रामराये दुरी धरियेलें ।
कठीण कैसें जालें चित्त तुझें ॥ १ ॥

देउनी आलिंगन प्रीतीपडीभरें ।
कैं मुख पीतांबरें पुससील ॥ २ ॥

घेउनी कडीये धरूनी हनुवटी ।
कैं गुजगोष्टी सांगसील ॥ ३ ॥

रामदास म्हणे केव्हां संबोधिसी ।
प्रेमपान्हा देसी जननीये ॥ ४ ॥

रामराया, मला असें दूर कां धरिलेंत ? तुम्ही इतके कठोर कसे झालांत ?

मला प्रेमातिरेकानें मिठी मारून माझें तोंड आपल्या पीतांबरानें केव्हां पुसाल बरें !

मला कडेवर घेऊन आणि माझी हनुवटी धरून माझ्याशीं गुजगोष्टी केव्हां कराल ?

आई, मला हाक मारून प्रेमपान्हा केव्हां देशील ?

टाळ धरूं कथा करूं ।
रामालागीं हाका मारूं ॥ १ ॥

येरे रामा येरे रामा ।
तुझी आवडी लागो आम्हां ॥ २ ॥

तुजविण गाईल कोण ।
ऊठ सांडिलें मीतूंपण ॥ ३ ॥

रामदास पाहे वास ।
भेटी द्यावी सावकाश ॥ ४ ॥

आम्ही टाळ वाजवून कथा करूं आणि रामरायाला हाका मारूं. रामराया, ये, इकडे ये.

आम्हाला तुझी आवड लागूं दे.

तुझ्याशिवाय कोणाचें गाणें सुचणार ? ऊठ, मी दुजाभाव टाकून दिला आहे.

देवा, मी वाट पाहात आहें. मला स्वस्थपणें भेट दे.

जेथें जावें तेथें राम समागमीं ।
आतां कासया मी खंती करूं ॥ १ ॥
खंती करूं ज्याची तो समागमेंचि ।
पाहातां सुखाची घडी होय ॥ २ ॥
अहो देव खरा भूमंडळवासी ।
जातां दिगंतासी सारिखाचि ॥ ४ ॥
सारिखाचि जनीं वनीं वनांतरीं ।
तो गिरिकंदरीं सारिखाचि ॥ ४ ॥
सारिखाचि देव कदा पालटेना ।
राहे त्रिभुवना व्यापुनियां ॥ ५ ॥
व्यापुनियां दासासन्निधचि वसे ।
विचार विलसे रामदासीं ॥ ६ ॥

जावें तेथें राम बरोबर आहे—आतां मी खिन्न कां होईन !

ज्याच्या भेटीची मला उत्कंठा, तो माझ्या सन्निधच आहे. त्याचें दर्शन म्हणजे सुखाचे क्षण होत.

अहो देवाचा वास खरोखर अवघ्या भूमंडळांत आहे.

तो जसा दिगंतरांत आहे, अगदीं तसाच तो जनीं वनीं वनांतरीं तद्वत गिरीकंदरींही आहे.

देवांत कधींही फरक होत नाहीं : तो अक्षर आहे. त्यानें त्रिभुवन व्यापून टाकिलें आहे.

तो भक्तांच्या अगदीं सन्निध आहे. ह्या विचारानें माझ्या मनाला आल्हाद वाटत आहे.

येथें उभा कां श्रीरामा। मनमोहन मेघश्यामा ॥ १ ॥

काय केली सीताबाई। येथें राही रखुमाबाई ॥ २ ॥

काय केली अयोध्यापुरी। येथें वसविली पंढरी ॥ ३ ॥

काय केली शरयू गंगा। येथें आणिली चंद्रभागा ॥ ४ ॥

धनुष्य बाण काय केले। कर कटावरि ठेविले ॥ ५ ॥

काय केलें वानरदळ। येथें मिळविले गोपाळ ॥ ६ ॥

रामीरामदासीं भाव। तैसा होय पंढरिराव ॥ ५ ॥

मनमोहना मेघश्यामा श्रीरामचंद्रा, तूं येथें कां उभा ?

सीताबाई कोठें गेली ? येथें तर राही रखुमाई उभ्या आहेत !

अयोध्यापुरीचें काय केलेंत ? येथें पंढरी वसविली आहे !

शरयू-गंगा कोठें नेलीत ? येथें चंद्रभागा आणिली आहे.

तुमच्या हातांतील धनुष्यबाणांचें काय झालें ? येथें तर तुम्हीं कमरेवर हात ठेविले आहेत !

तुमची वानरसेना कोठें पळाली ? येथें गोपाळ जमले आहेत !

जसा ज्याचा भाव तसा त्याच्यासाठीं पंढरीराया होत असतो.

पाचारितां यावें बोलवितां जावें ।
हें तो न संभवे तुम्हांपाशीं ॥ १ ॥

जेथील तेथींचें प्रगटलें रूपडें ।
आपुल्या सुरवाडें भक्तांचिया ॥ २ ॥

जाणें येणें नाहीं तुम्हां कदाकाळीं ।
असा भूमंडळीं व्यापूनियां ॥ ३ ॥

निळा म्हणे ऐसें जाणोनिया मनीं ।
करितों अनुदिनीं स्तवन तुमचें ॥ ४ ॥

तुम्हांला बोलाविलें म्हणजे इकडे याल, दुसरीकडे कोणीं बोलाविलें म्हणजे तिकडे जाल, असा प्रकार तुमच्या बाबतींत होण्याचा संभवच नाहीं.

तुमच्या भक्तांचा सुकाळ म्हणून जेथें तेथें तुमचीं रूपें प्रकट झालेलीं दिसतात.

तुम्हांला जा-ये ठाऊक नाहीं. तुम्ही सर्व भूमंडळ व्यापून टाकिलें आहे.

हें मनांत पक्कें समजून मी तुमचें स्तवन रोज करीत असतों.

देखतांचि विटेवरी ।
समान पाउलें साजिरीं ॥ १ ॥

माझें लांचावलें मन ।
नुठी बैसलें वरून ॥ २ ॥

न सुटे मुंगियेसी गूळ ।
जेवीं भ्रमरा आमोद कमळ ॥ ३ ॥

निळा म्हणे तैसें झालें ।
मक्षिकें मोहळें गोंविले ॥ ४ ॥

विटेवरील तीं गोजिरवाणीं समान पाउलें पाहातांच लालचावलेलें माझें मन त्यावरून मुळींच हालत नाहीं.

गुळाला चिकटलेली मुंगी जशी त्याला सोडीत नाहीं, अगर कमळाचा आस्वाद घेणारा भुंगा जसा त्यापासून बाजूला होत नाहीं, तशी माझी गत झाली आहे. मधाच्या पोळ्यानें ह्या माशीला अडकवून टाकिलें आहे.

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥

तुळसीहार गळां कासे पितांबर ।
आवडे निरंतर तेंचि ध्यान ॥ २ ॥

मकरकुंडलें तळपती श्रवणीं ।
कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥ ३ ॥

तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

अहाहा, कमरेवर हात ठेवून विटेवर उभें असलेलें विठ्ठलाचें तें ध्यान किती मोहक आहे !

पीतांबर नेसलेली आणि गळ्यांत तुळशीहार घातलेली ती मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें निरंतर उभी आहे.

कानांत मकरकुंडलें झळकत आहेत आणि गळ्यांत कौस्तुभमणि शोभत आहे.

त्या मूर्तीच्या दर्शनांतच माझें सारें सुख सामावलें आहे.

विठ्ठलाचें तें ध्यान मी प्रेमानें पाहात बसेन.

सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति ।
रखुमाईच्या पती सोयरीया ॥ १ ॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ २ ॥

विठो माउलिये हाचि वर देईं ।
संचरोनि राहीं हृदयामाजी ॥ ३ ॥

तुका म्हणे कांहीं न मागें आणीक ।
तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

सख्या रुक्मिणीपते, माझे डोळे तुझ्या मूर्तीवर सदोदित जडलेले असोत.

तुझें रूप गोड आहे, नांव गोड आहे, मला सर्वकाळ तुझें प्रेम मिळू दे.

आई विठाबाई, माझ्या हृदयांत प्रवेश करून राहा. मला हाच वर दे.

मला तुझ्यापाशीं आणखी कांहींही मागावयाचें नाहीं. तुझ्या पायांशींच मला सर्व सुख मिळत आहे.

त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं ।
आमचें त्या काई असे ओझें ॥ १ ॥

पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर ।
तया मुखीं चारा कोण घाली ॥ २ ॥

पक्षी अजगर न करी संचित ।
तयासि अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥

तुका म्हणे तया भार घातलीया ।
उपेक्षीना दयासिंधु माझा ॥ ४ ॥

त्रैलोक्याचासुद्धां सांभाळ करणें ज्याला जड नाहीं त्याला आमचें का ओझें होणार आहे ?

दगडाच्या सांधींत बसलेल्या बेडकाला खायला कोण घालतें ?

इकडून तिकडे भराऱ्या मारीत फिरणारे पक्षी काय किंवा सुस्तपणें एकाच जागीं पडून राहाणारें अजगर काय, कोणीही आपलें भक्ष्य सांठवून ठेवीत नाहींत, तरीपण परमेश्वर त्यांचें पोषण करीत असतोच.

माझा विठ्ठल दयासिंधु आहे. त्याच्यावर भार घातला असतां तो आपली उपेक्षा करणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८८३ वि: काव्य
क्रमांक ९८२९ नों: दि: २५।५।८८

तूं माझी माउली तूं माझी साउली ।
पाहातों वाटुली पांडुरंगे ॥ १ ॥

तूं मज येकुला वडील धाकुला ।
तूं मज आपुला सोयरा जीव ॥ २ ॥

तुका म्हणे जीव तुजपाशीं असे ।
तुजविण ओस सर्व दिशा ॥ ३ ॥

पांडुरंगा, तूं माझी माउली आहेस, श्रमपरिहार करणारी सावलीही मला तूंच आहेस. देवा, मी तुझी वाट पाहात आहें. मला वडील, धाकटा तूंच एक आहेस. माझा लाडका प्राणही तूंच आहेस.

माझा जीव तुझ्यापाशीं अडकला आहे, तुझ्याविना मला साऱ्या दिशा ओस भासत आहेत.

भेटीलागीं जीवा लागलीसे आस ।
पाहे रात्रीं दिवस वाट तुझी ॥ १ ॥
पूर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन ।
तैसें माझें मन वाट पाहे ॥ २ ॥
दिवाळीच्या मुळा लेंकी आसावली ।
पाहतसे वाटुली पंढरीची ॥ ३ ॥
भुकेलिया बाळ अति शोक करी ।
वाट पाहे परि माउलीची ॥ ४ ॥
तुका म्हणे मज लागलीसे भूक ।
धांवूनि श्रीमुख दावीं देवा ॥ ५ ॥

देवा, मला तुझ्या भेटीची उत्कंठा लागली आहे : मी रात्रंदिवस तुझी वाट पाहात आहें.

चकोराचें जीवन पौर्णिमेच्या चंद्रावर अवलंबून असतें म्हणून तो जशी पूर्ण-चंद्राची मार्गप्रतीक्षा करीत राहातो, तसें माझें मन तुझी वाट पाहात आहे.

दिवाळीसाठीं माहेरचें बोलावणें येईल म्हणून मुलगी जशी आशेनें वाट बघत बसते, तद्वत् मी पंढरीच्या वाटेकडे डोळे लावून बसलों आहें.

बालक भुकेनें आक्रोश करीत असलें तरी त्याचे डोळे आईच्या वाटेकडे लागलेले असतात.

देवा, मला तुझ्या दर्शनाची भूक लागली आहे ; तर धावून ये, मला तुझें श्रीमुख दिसूं दे.

कासियानें पूजा करूं केशीराजा ।
हाचि संदेह माझा फेडीं आतां ।। १ ।।
उदकें न्हाणूं तरी स्वरूप तें तुझें ।
तेथें काय माझें वेंचे देवा ।। २ ।।
गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ ।
तेथें मी दुर्बळ काय करूं ।। ३ ।।
फळदाता तूंच तांबोल अक्षता ।
तरी काय आतां वाहों तुज ।। ४ ।।
वाहूं दक्षिणा जरी धातु नारायण ।
ब्रह्म तेंचि अन्न दुजें काई ।। ५ ।।

केशवा, तुझी पूजा कोणत्या साहित्यानें करावी, ह्याचा मला प्रश्न पडला आहे. आतां तूंच तो सोडीव.

तुला उदकानें स्नान घालावें, तर तें तुझेंच रूप आहे. त्यांत माझें असें काय खर्च होणार ?

तुला सुगंध लावावा, तर गंध चंदनाचें असणार ; सुवास अर्पावा, तर तोही फुलांचाच असणार – तेथें माझें असें काय आहे ?

फल, तांबूल, अक्षता हीं सर्व कांहीं देणारा दाता तूंच आहेस. त्या सर्व वस्तु तुझ्याच आहेत, तर मग आतां मी तुला माझें असें काय वाहूं ?

तुझ्यापुढें दक्षिणा ठेवूं तर ती धातुही नारायणच आहे. नैवेद्य दाखवूं म्हणेन तर अन्न हें ब्रह्मच आहे ; दुसरें काय ?

गातां तूं ओंकार टाळी नादेश्वर ।
नाचावया थार नाहीं कोठें ॥ ६ ॥

तुका म्हणे मज अवघें तुझें नाम ।
धूप दीप रामकृष्ण हरि ॥ ७ ॥

तुझ्यापुढें गावें तर ध्वनि तूंच आहेस, टाळी वाजवावी तर नादही तूंच आहेस. बरें, नाचावें तर नाचावयाला तुझ्याविना जागा तरी कोठें आहे ?

तेव्हां अशा स्थितींत देवा, 'रामकृष्णहरि' हा तुझा मंत्र हेंच माझें धूप, दीप आदिकरून सारें पूजासाहित्य आहे.

काय विरक्ति कळे आम्हां ।
जाणों एका नामा विठोबाच्या ॥ १ ॥

नाचों सुखें वैष्णवमेळीं ।
टाळघोळीं आनंदें ॥ २ ॥

शांति क्षमा दया मी काय जाणें ।
गोविंद कीर्तनेंवांचूनियां ॥ ३ ॥

कासया उदास असों देहावरी ।
अमृतसागरीं बुडोनियां ॥ ४ ॥

कासया एकांत सेवूं तया वना ।
आनंद तो जनामाजी असे ॥ ५ ॥

तुका म्हणे आम्हां ऐसा भरवसा ।
विश्वेश सरसा चालतसे ॥ ६ ॥

आम्ही एक विठोबाचें नांव तेवढें जाणतों. विरक्ति म्हणजे काय तें आम्हांला कसें कळणार ?

वैष्णवांच्या मेळ्यांत आम्ही टाळ वाजवून त्यांच्या निनादांत आनंदानें नाचूं!!

शांति, क्षमा, दया, वगैरे गोष्टी आम्हांला समजत नाहींत, गोविंदाच्या कीर्तनावांचून आम्हांला दुसरें कांहीं ठाऊक नाहीं.

अशा ह्या अमृतसागरांत बुड्या मारीत असतां मी जीवनांत उदास कां राहूं ?

ह्या जनसंमर्दामध्येंच आनंद मिळत असतां मी एकान्तासाठीं वनांत कां जाऊं ?

विठ्ठल आमच्यापुढें चालला आहे, आम्हांला अभ्युदयाचा मार्ग दाखवीत आहे, अशी आमची खात्री आहे.

बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त ।
तया सुखा अंतपार नाहीं ॥ १ ॥

येऊनी अंतरीं राहील गोपाळ ।
सायासाचें फळ बैसलिया ॥ २ ॥

रामकृष्ण हरि मुकुंद मुरारी ।
मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥ ३ ॥

तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य ।
जरी होईल भाव एकविध ॥ ४ ॥

निवान्त बसून आपलें चित्त शुद्ध कर. त्यामुळें होणाऱ्या आनंदाला पार नाहीं.

रामकृष्णहरि मुकुंदमुरारि हा मंत्र वेळोवेळां जपत राहा. त्यामुळें अति सायासानें मिळणारें फळ तुला बसल्याजागींच मिळेल; गोपाळ तुझ्या अंतःकरणांत प्रविष्ट होऊन राहील.

देवाच्या ठिकाणीं तुझा भाव दृढ झाला तर तो तुझ्या अंतरंगांत येऊन राहील, हें मी निश्चयपूर्वक सांगतों. त्यासाठीं हवें तें दिव्य करीन.

कुमुदिनी काय जाणे तो परिमळ ।
भ्रमर सकळ भोगीतसे ॥ १ ॥

तैसें तुज ठावें नाहीं तुझें नाम ।
आम्हीच तें प्रेमसुख जाणों ॥ २ ॥

माते तृण बाळा दुधाची ते गोडी ।
ज्याची नये जोडी त्यासी कामा ॥ ३ ॥

तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीपोटीं ।
नाही त्याची भेटी भोग तिये ॥ ४ ॥

कमलिनीला आपल्या फुलाच्या वासाची कल्पना नसते, भ्रमर मात्र त्याचा उपभोग घेत असतो.

तद्वत् देवा, तुला तुझ्या नांवाच्या गोडीची कल्पनाही नाहीं. त्याचा आनंद आम्हीच जाणों.

धेनु गवत खाते, पण त्यापासून तयार होणाऱ्या दुधाची गोडी तिचें वत्स चाखीत असते.

जगाचा न्यायच आहे कीं ज्यानें एखाद्या वस्तूची जोड केलेली असते त्याला तिचा लाभ मिळत नाहीं. फायदा दुसरींच माणसें उठवितात.

शिंपल्याच्या पोटांत मोतीं तयार होतात, पण त्यांपासून बनविलेल्या भूषणांचा लाभ त्या बिचाऱ्याला कधींही घडत नसतो.

घेईं माझे वाचे ।
गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥

तुम्ही घ्या रे डोळे सुख ।
पाहा विठोबाचें मुख ॥ २ ॥

तुम्ही ऐका रे कान ।
माझ्या विठोबाचे गुण ॥ ३ ॥

मना तेथें धांव घेईं ।
राहें विठोबाचे पायीं ॥ ४ ॥

तुका म्हणे जीवा ।
नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

माझे वाचे, विठोबाच्या गोड नांवाचा उच्चार कर.

डोळ्यांनो, विठोबाचें मुख पाहून दर्शनसुख घ्या.

कानांनो, त्याच्या गुणांचें श्रवण करा. आणि मना, विठोबाकडे धाव घे, त्याच्या पायांपाशीं राहा.

बा जिवा, ह्या केशवाला सोडूं नकोस.

आणीक दुसरें मज नाहीं आतां ।
नेमिलें या चित्तापासुनियां ॥ १ ॥

पांडुरंग मनीं पांडुरंग ध्यानीं ।
जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥

पडिलें वळण इंद्रियां सकळां ।
भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ ३ ॥

तुका म्हणे नेत्रीं केलें ओळखण ।
साजिरें तें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥

माझ्या चित्ताला आतां दुसरें कोणतेंही व्यवधान उरलेलें नाहीं. ध्यानीं, मनीं, जागेपणीं, स्वप्नीं एक पांडुरंगच तेवढा माझ्यापुढें उभा आहे.

साऱ्या इंद्रियांची धांव त्या एका पांडुरंगाकडे आहे. त्यांना त्याच्याशिवाय दुसरा विषयच उरलेला नाहीं.

विटेवरील ती गोजिरवाणी मूर्ति माझ्या डोळ्यांना पांडुरंगाची ओळख पटवून देत आहे.

विठ्ठल हा चित्तीं ।
गोड लागे गातां गीतीं ॥ १ ॥

आम्हां विठ्ठल जीवन ।
टाळ चिपळियाधन ॥ २ ॥

विठ्ठल हे वाणी ।
अमृत हे संजिवनी ॥ ३ ॥

रंगला या रंगें ।
तुका विठ्ठल सर्वांगें ॥ ४ ॥

आमचें चित्त विठ्ठलमय बनलें आहे. त्याचे गोडवे गातांना मनाला आनंद वाटतो.

विठ्ठल हेंच आमचें जीवन आणि टाळचिपळ्या हेंच आमचें धन आहे.

विठ्ठलाचें नांव हें अमृत आहे – तो आमचा संजीवनी मंत्र आहे.

मी विठ्ठलाच्या नामसंकीर्तनांत पूर्णपणें रंगून गेलों आहें.

प्रेमअमृतें रसना ओलावली ।
मनाची राहिली वृत्ति पायीं ॥ १ ॥

सकळ ही तेथें वोळलीं मंगळें ।
वृष्टि केली जळें आनंदाच्या ॥ २ ॥

सकळ इंद्रियें जालीं ब्रह्मरूप ।
ओतलें स्वरूप माजी तया ॥ ३ ॥

तुका म्हणे जेथें वसे भक्तराव ।
तेथें नांदे देव संदेह नाहीं ॥ ४ ॥

चित्तवृत्ति विठ्ठलाच्या पायांवर स्थिरावल्या आहेत, जिव्हा त्याच्या प्रेमामृताचा आस्वाद घेत आहे. सर्व इंद्रियें, त्यांच्यांत विठ्ठलाचें रूप ओतल्यामुळें तद्रूप झालीं आहेत – विठ्ठलमय बनलीं आहेत, आणि मांगल्याचा सर्वत्र उदय झाल्याकारणानें, डोळ्यांवाटे आनंदाश्रु वाहूं लागले आहेत. असा भक्तराज जेथें असतो, तेथें देव नांदत असलाच पाहिजे. त्यांत मुळींही संदेह नाहीं.

पूर आला आनंदाचा ।
लाटा उसळती प्रेमाच्या ॥ १ ॥

बांधूं विठ्ठल सांगडी ।
पोहुनि जाऊं पैल थडी ॥ २ ॥

अवघेजन गडी ।
घाला उडी भाईनो ॥ ३ ॥

हें तों नाहीं सर्वकाळ ।
अमुप अमृताचें जळ ॥ ४ ॥

तुका म्हणे थोरा पुण्यें ।
ओघ आला पंथें येणें ॥ ५ ॥

आनंदाचा पूर आला आहे, प्रेमाच्या लाटा उसळत आहेत.

गड्यांनो, सारेजण मिळून उडी घालूं या. विठ्ठलाची सांगड बांधून तिच्या साहाय्यानें आपण पैलतीर गांठूं.

अमृताचा हा प्रचंड ओघ फार वेळ टिकणार नाहीं.

आपली पुण्याई थोर म्हणूनच तो आपल्या वांट्याला आलेला आहे. तर बंधुहो, ही संधि वायां दवडूं नका.

आपल्या माहेरा जाईन मी आतां ।
निरोप या संतां हातीं आला ॥ १ ॥

सुख दुःख माझें ऐकिलें कानीं ।
कळवळा मनीं करुणेचा ॥ २ ॥

करुनी सिद्ध मूळ साउलें भातुकें ।
येती दिसें एकें न्यावयासी ॥ ३

त्याचि पंथें माझें लागलेंसे चित्त ।
वाट पाहे नित्य माहेराची ॥ ४ ॥

तुका म्हणे आतां येतील न्यावया ।
अंगें आपुलिया मायबाप ॥ ५ ॥

मी आतां आपल्या माहेरीं जाईन. ह्या संतांबरोबर निरोप आला आहे.

हीं माझ्या माहेरचीं माणसें ! माझ्या सुखदुःखाच्या गोष्टी त्यांनीं मायेच्या उमाळ्यानें ऐकून घेतल्या.

त्यांच्या बोलण्यावरून असें दिसतें कीं माझ्यासाठीं खण व खाऊ घेऊन मला माहेरीं घेऊन जाण्यासाठीं कोणी तरी येत असावें.

त्याच्या येण्याकडेच माझें सारें चित्त लागलें आहे. मी एकसारखी माहेराची वाट पाहात आहें.

अजून कोणी आलें नाहीं, तेव्हां आतां माझे आईबाप श्रीपांडुरंग स्वतःच मला न्यावयाला येत असावेत.

गोविंद गोविंद ।
मना लागलिया छंद ॥ १ ॥

मग गोविंद ते काया ।
भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥

आनंदलें मन ।
प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥

तुका म्हणे आळी ।
जेवीं नुरेचि वेगळी ॥ ४ ॥

गोविंद, गोविंद असा मनाला ध्यास लागला कीं मग सर्व देह गोविंदमय बनून जातो. देवांत आणि देहांत भेद राहात नाहीं.

मन आनंदातिशयानें भारावल्यामुळें डोळ्यांवाटे प्रेमाश्रु वाहूं लागतात.

पतंगाच्या ध्यासानें आळी जशी स्वतःच पतंग बनून जाते, तद्वत् गोविंदाचा छंद लागलेल्या माणसाची गत होते. तो स्वतःच गोविंद बनतो. वेगळा राहातच नाहीं.

लवण मेळवितां जळें ।
काय उरलें निराळें ॥ १ ॥

तैसा समरस जालों ।
तुजमाजीं हरपलों ॥ २ ॥

अग्निकर्पूराच्या मेळीं ।
काय उरली काजळी ॥ ३ ॥

तुका म्हणे होती ।
तुझी माझी एक ज्योती ॥ ४ ॥

मीठ पाण्यांत टाकलें असतां तें वेगळें राहात नाहीं, विरघळून जातें; त्याप्रमाणें देवा, मी तुझ्याशीं समरस झालों आहें. तुझ्यांत विरून गेलों आहें.

कापराला अग्नीचा संयोग झाला म्हणजे ते दोन्ही एकत्र जळतात; काजळी-देखील शिल्लक राहात नाहीं.

त्याप्रमाणें देवा, आतां तुझी माझी एकच ज्योत झाली आहे: निराळें कांहींच उरलेलें नाहीं.

ज्ञा ने श्व र

जे खळांची व्यंकटी सांडो ।
तयां सत्कर्मीं रति वाढो ।
भूतां परस्परें पडो ।
मैत्र जीवाचें ॥ १ ॥

दुरिताचें तिमिर जावो ।
विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो ।
प्राणिजात ॥ २ ॥

दुष्टांचा कुटिलपणा जावो;
त्यांना सत्कर्माबद्दल प्रीति वाटो;
आणि प्राणिमात्राची आपआपसांत मैत्री घडो.
अज्ञान अंधकार लयाला जावो;
विश्वधर्माचा प्रकाश पडो;
आणि प्राणिमात्राची जी जी इच्छा असेल.
ती ती पूर्ण होवो.

## सूचि


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ॐ नमोजी | ७ | कळेल तैसें गाईन | ५२ |
| अग्नि जाळी तरी | ५१ | कांदा मुळा भाजी | ५० |
| अडखळुनी पडसी | २८ | काया ही पंढरी | ६७ |
| अणुरेणुपासुनी | ६२ | काय विरक्ति | ८२ |
| अणुमाजी राम | ३३ | कासयानें पूजा | ८०-८१ |
| अनादि निर्मळ | ४४ | कांवो रामराये | ६९ |
| अनाथाचा नाथ | ४२ | गगनीं ध्रुव | २१ |
| अमृताहूनि गोड | १८ | गुजगुजीत रूप | ९ |
| अवघाचि संसार सुखाचा | ८ | गोविंद गोविंद | ९१ |
| अवघाचि संसार केला | १५ | गंगा गेली | ३६ |
| आणीक दुसरें | ८६ | घेईं माझे वाचे | ८५ |
| आपुल्या माहेरा | ९० | चक्रवाक पक्षी | २३ |
| आले तुझ्या दर्शनासी | ५७ | चतुर्भुज मूर्ती | ६० |
| आंधळ्याची काठी | ३७ | चित्तीं पाय | ५३ |
| ऊस डोंगा | ४३ | जे खळांची | ९३ |
| कमोदिनी काय जाणें | ८४ | | |



दा. क. 92609

| | पृष्ठ |
|---|---|
| जेथें जावें तेथें | ७१ |
| जेथें पाहें तेथें | १२ |
| जेवीं लग्नघडी | ५६ |
| ज्या रूपाकारणें | १३ |
| टाळ धरूं | ७० |
| तारीं मज आतां | ४१ |
| तुझिया सत्तेनें | २० |
| तुझें रूप | २५ |
| तूं माझी माउली | ७८ |
| त्रैलोक्य पाळितां | ७७ |
| दीनाचा दयाळू | ६८ |
| देखतांचि विटेवरी | ७४ |
| देव सर्वां ठायीं | ६३ |
| देवा माझें मीपण | ७० |
| देह जावो | ३१ |
| धरिला पंढरीचा चोर | ३९ |
| नको देवराया | ५९ |
| नागरें गोमटें | ६१ |
| नाचूं कीर्तनाचे रंगीं | ३२ |
| नाम आणि रूप | १७ |
| नाहीं मज आशा | ४८ |
| नाहीं प्रेम भाव | ४७ |
| पतित पावन | ५८ |
| पक्षी जाय | ३८ |
| पाचारितां यावें | ७३ |
| पाहूं द्या रे | ३० |
| पूर आला | ८९ |

| | पृष्ठ |
|---|---|
| बैल तो गे काऊ | ११ |
| प्रेम अमृतें | ८८ |
| बैसोनि निवांत | ८३ |
| भेटीलागीं जीवा | ७९ |
| मज तो नवल | ४५ |
| माझी गती कोण | २२ |
| माझें मन | ६६ |
| माझे मनोरथ | २४ |
| मुकिया साखर | १६ |
| येईं येईं गरुडध्वजा | ४६ |
| येग येग विठाबाई | ३४ |
| येथें सुखाचिया राशी | ५४ |
| येथें उभा कां | ७२ |
| येथुनि पाहें | ६४ |
| रुणझुण पायीं | २६–२७ |
| रूप पाहतां | १० |
| लवण मेळवितां | ९२ |
| वारंवार काय | २९ |
| विठ्ठल हा चित्तीं | ८७ |
| विठो माझा | ३५ |
| वेद गणितां | ५५ |
| शिव आणि विष्णु | ४९ |
| सत्य संकल्पाचा | १९ |
| सदा माझे डोळे | ७६ |
| सुंदर तें ध्यान | ७५ |
| हरीवीण भावो | १४ |
| हृदयस्थ असोनी | ६५ |

सद्धर्म
प्रकाशन

# ऋग्वेदाची
# ओळख

लेखक गुंडोपंत हरिभक्त

मराठा ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38883 वि: काव्य
क्रमांक 9829 नों दि: 95/11/65

ऋग्वेद हा जगांतील सर्वांत जुना ग्रंथ असून तो आपल्या धर्माचा मूळ पाया आहे. पण हजारों वर्षांचा कालावधि गेल्यामुळें त्यावर घनदाट जाळीं–जळमटें धरलीं आणि त्याचा मूळांतील अर्थ दिसेनासा झाला. परिणामीं आज अनेक वर्षें आपल्याला खऱ्या धर्मांचा विसर पडला आहे. उलट वेडगळ कल्पना, भ्रामक समजुती, नवस–सायास, उपास–तापास, शाब्दिक वाद, बौद्धिक तर्कटें आणि पांथिक अवडंबरें म्हणजेच धर्म असें होऊन बसलें आहे. त्यामुळें नैतिक मूल्यें ढांसळून सर्वसाधारण व्यक्तीचा कमकुवतपणा वाढला आहे.

ह्या परिस्थितीचा फायदा नास्तिक जडवादी लोक आपल्या स्वार्थासाठीं करून घेत आहेत आणि त्याचा परिणाम म्हणजे समाजांत देहपूजा बळावली असून आसुरी संपत्तीची वाढ झपाट्यानें होत आहे. ह्या दु:स्थितींतून बाहेर पडावयाचें असेल तर त्यासाठीं प्रथम आपला धर्म खरोखरी काय आहे हें समजून घेण्याकरितां त्याचें मूळ जो ऋग्वेद त्याची माहिती करून घेणें अवश्य आहे.

त्या दृष्टीनें वरील पुस्तक आपणांस खात्रीनें मार्गदर्शक होईल. लेखकानें त्यांत ऋग्वेदाचा अर्थ मुद्देसूद पण सोप्या भाषेंत दिला असून ऋषींच्या अंतरंगांत शिरून त्यांच्या विचारांवर अगदीं नवीन प्रकाश पाडला आहे.

पृष्ठें १०३ वेधक दुरंगी मुखपृष्ठ मूल्य दीड रुपया

गो. म. नवाथे, ९ ओवेन्डन रोड, गांवदेवी, मुंबई ७

REFBK-0012709
REFBK-0012709